श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

मार्च २०२५ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | शिवजयंती विशेषांक, पाने ३२ | Regn. No. - MAHMAR/2022/86035

## श्रीशिवजयंती सोहळा, श्रीक्षेत्र डेरवण

### शिवराज्याभिषेक शक ३५१



# श्रीशिवजयंती सोहळा, श्रीक्षेत्र डेरवण

## शिवराज्याभिषेक शक ३५१




*डावीकडून – श्री. सचिन कानिटकर, श्री. विकासराव वालावलकर, श्री.रमेश पतंगे, सौ. सायली गोडबोले-जोशी, डॉ. सुवर्णा पाटील, श्री. शशिकांतभाऊ सुतार*

श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट, श्रीक्षेत्र डेरवण आयोजित श्रीशिवजयंती सोहळा फाल्गुन वद्य तृतीया, शक १९४६; शिवराज्याभिषेक शक ३५१; सोमवार, दि. १७ मार्च २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता श्रीशिव-समर्थगड, श्रीक्षेत्र डेरवण येथे प्रतिवर्षांप्रमाणेच अत्यंत उत्साहाने साजरा झाला. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान साप्ताहिक विवेकचे संपादक, ज्येष्ठ विचारवंत, लेखक 'पद्मश्री' रमेश पतंगे यांनी भूषविले तर प्रमुख वक्त्या लेखिका, नामवंत सूत्रसंचालिका, अभिनेत्री आणि नाट्यदिग्दर्शिका सौ. सायली गोडबोले-जोशी या होत्या. मा. शशिकांतभाऊ सुतार, मा. प्रा. सचिन कानिटकर, ट्रस्टच्या आरोग्य संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनीही या वेळी उपस्थित राहून आपले विचार व्यक्त केले.

ढोल ताशांच्या गजरात अध्यक्ष, प्रमुख वक्त्यांसह सर्व प्रमुख पाहुणेमंडळींनी शिवसृष्टीतील श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती आणि भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर यांच्या प्रतिमांना तसेच श्रीशिव-समर्थ मंदिरातील श्रीशिवछत्रपतींच्या तसेच संत रामदास, संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली. ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते शिव-समर्थ मंदिराच्या प्रांगणात ध्वजारोहण झाल्यावर ध्वजप्रार्थना-पठण झाले आणि शिव-समर्थगडाच्या भव्य सभागृहात सभेच्या कामकाजाला सुरुवात झाली. प्रथम इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यगीत – 'गर्जा महाराष्ट्र माझा' जोषपूर्ण रितीने सादर केले. वे.मू. मंदार फडकेगुरुजी, वे.मू. मिलिंद बोरकरगुरुजी, वे.मू. दीपक पटवर्धन आणि ब्रह्मवृंदाने शांतिसूक्त पठण केले. सभेच्या



*अध्यक्ष श्री. रमेश पतंगे, श्री. विकासराव वालावलकर, श्री. शशिकांतभाऊ सुतार आणि पाहुण्यांचे सभास्थानी आगमन*

सूत्रसंचालिका सौ. शरयू यशवंतराव प्रास्ताविक करताना म्हणाल्या, ‘‘महाराजांच्या अवघ्या ३५ वर्षांच्या कारकीर्दीने मोगल साम्राज्य कायमचे संपवले, जागोजागी एतद्देशीय राजे जोरकस झाले. स्वराज्याने निर्माण केलेल्या पोकळीत जाट, शीख ह्या सत्ता वाढल्या. इस्लामी / गैरभारतीय धर्मप्रसाराला आळा बसला. नवाब बाजीराव पेशव्यांच्या मातोश्रींची चारधाम यात्रा निर्वेध होईल म्हणून संरक्षण पुरवू लागले. भारतात परत कधीही जिझिया लागू झाला नाही, एक दोन अपवाद वगळता कट्टर इस्लामिक / गैर भारतीय राजे टिकू शकले नाहीत. शिवराय इथल्या रयतेचे राजे होते. रयतेला प्रिय असलेल्या प्रत्येक गोष्टीचे रक्षणकर्ते होते. रयतेच्या झाडा-पानाचे, पिकांचे, संपत्तीचे, संस्कृतीचे, अब्रूचे आणि धर्माचेही विश्वस्त होते. आपल्या लोकांची मनं ह्या राजाने तळहातावर सांभाळली आणि म्हणूनच लोकांनी आपल्या राजाचा शब्द हृदयावर कोरून ठेवला. मराठी माणसाची प्रत्येक पिढी हा कोरलेला शब्द मनावर घेऊनच जन्मली, वाढली आणि गरज पडली तेव्हा लढलीही. सतराव्या शतकात जागृत झालेला तो स्वाभिमान, ती स्वराज्यनिष्ठा आजही



*ध्वजपूजन करताना प्रमुख विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर*



*श्रीसहजानंदसरस्वती महाराज आणि भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर यांच्या प्रतिमांना पुष्पांजली वाहताना श्री. रमेश पतंगे आणि मान्यवर पाहुणे*

महाराष्ट्राला प्रेरणा देते.

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे .... ' या, लोकमान्य टिळक यांनी केलेल्या गर्जनेलाही भक्कम आधार आणि अधिष्ठान होते ते शिवप्रभूंच्या हिंदवी स्वराज्याचेच.

अत्याचारी शत्रूच्या प्रति अत्यंत वज्रकठोर अन वीरश्रीयुक्त भूमिका अंगीकारणाऱ्या शिवरायांचे रूप स्वामी विवेकानंदांना भावले. ते म्हणतात 'शिवाजीमहाराज हा जणू शुभंकर ईश्वराचा देहरूप अवतारच होऊन गेला. म्लेंछांनी मांडलेल्या अधर्माच्या थैमानावर मात करून सद्धर्माची प्रतिरक्षा करण्यासाठी दंड थोपटून उभा राहणारा सामर्थ्यवान राजा. विखुरलेल्या राजवटीतून – त्यांच्या एकजुटीतून, अखंड भारताची निर्मिती करण्याचे दिव्य स्वप्न पाहणारा महापुरुष ! शिवाजीमहाराज ही आजच्या तरुण पिढीसाठी ऊर्जा आहे; जिचा वापर हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी होऊ शकतो !

महाराजांचे हे वेगळेपण आणि महत्त्व देशभरच नव्हे जगभर मान्य झालंय ! शिवाजीमहाराजांची जयंती हा भारतीय माणसाला त्याच्या सांस्कृतिक आणि राष्ट्रीय आकांक्षेची आठवण करून देण्याचा मुहूर्त आहे.

छत्रपती शिवाजीमहाराजांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन आपले आयुष्य घडवावे, त्यांच्या काही तरी गुणांचा स्वीकार करावा, असे प्रत्येक राष्ट्रप्रेमी नागरिकाला वाटले पाहिजे, याच उद्देशाने त्यांचा आदर्श समाजापुढे ठेवला जातो आणि शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.

केवळ अपार इच्छाशक्ती, तेजस्वी देशाभिमान आणि राष्ट्रसेवेसाठी समर्पित वृत्ती असलेली माणसेच असामान्य कार्य घडवू शकतात.

सुमारे ३५ वर्षांपूर्वी, अत्यंत कठीण परिस्थितीत श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती महाराजांनी शिवसमर्थ गडाची निर्मिती केली. त्यामागील प्रमुख हेतू म्हणजे देश, धर्म आणि संस्कृतीबद्दल समाजामध्ये स्वाभिमान जागृत करणे आणि शिवस्मारकाच्या



*सूत्रसंचालिका सौ. शरयू यशवंतराव*

माध्यमातून राष्ट्रहिताची प्रेरणा देणे. 'छत्रपती शिवाजीमहाराज की जय' या राष्ट्रमंत्राचे स्मरण सतत होत राहावे, या त्यांच्या दूरदृष्टीतून सुरू झालेला हा उत्सव आजही प्रचंड श्रद्धा व भक्तिभावाने साजरा केला जातो. राष्ट्रहित हेच परमोच्च या शिवविचारांची प्रेरणा इथे दरवर्षी मिळते.

याच परंपरागत शिवजयंती उत्सवाला 'Dervan Youth Games'ची जोड देत प. पू. श्री काकामहाराजांनी त्याचे चैतन्य शतपटीने वाढवले. कुमारवयीन मुलामुलींच्या अंगभूत कौशल्याचा सन्मान करत, त्यांच्यात सकारात्मक विचार रुजवत, शालेय वयातच व्यायाम, राष्ट्रहित आणि संस्कार यांचा संगम घडवून Dervan Youth Gamesचे भव्य स्वरूप साकारले. या उपक्रमाला मूर्त स्वरूप देण्यासाठी श्री. वालावलकरसाहेब सदैव सज्ज आहेत.

निष्काम कर्मयोगाच्या तत्त्वांवर चालणारी ही प्रेरणादायी चळवळ गेल्या आठ दिवसांपासून अखंड धगधगत आहे आणि तिचा परमोच्च क्षण म्हणजे शिवजयंती उत्सव!''

प्रास्ताविकानंतर सभेचे अध्यक्ष आणि प्रमुख वक्त्यांचा परिचय करून देण्यात आला आणि ट्रस्टतर्फे श्री. विकासराव वालावलकर यांनी शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. अन्य वक्ते मा. शशिकांतभाऊ सुतार, प्रा. सचिन कानिटकर, डॉ. सुवर्णा पाटील तसेच डॉ. श्रीपाद बाणावली, डॉ. सुनील नाडकर्णी, डॉ. आनंद जोशी, डॉ. सदानंद शेट्ये, डॉ. अनिल नेरुरकर, डॉ. मधुकर जोशी, श्री. राजीव उपळेकर, श्री. रमेश



शांतिसूक्त पठण



*ध्वजप्रार्थना पठण*



*महाराष्ट्र राज्यगीत गाताना इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थीनी*

बोडके, श्री. गायकवाड, श्री. मिलिंद खाडिलकर आदी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या काही समाजसेवकांचा ट्रस्ट प्रतिवर्षी सत्कार करितो. या वर्षी श्री. प्रदीप वसंत शिळीमकर (अध्यक्ष, आधार सामाजिक सेवा संस्था, महाड, जि. रायगड), श्री. अनंत संभाजी फोंडके (वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग) आणि चिपळूणच्या सौ. दीपमाला दीपक नाटुस्कर (महिला अध्यक्ष, रत्नागिरी जिल्हा सुतार समाज) यांचा अध्यक्षांच्या हस्ते चांदीचा प्याला आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सत्कारमूर्तींतर्फे श्री. प्रदीप शिळीमकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, ''वालावलकर रुग्णालयाने आमच्या कामाचा सत्कार केला याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. आमच्या दुर्गम भागातून येथे येणाऱ्या रुग्णांना नवसंजीवनी देण्याचे काम हे रुग्णालय आणि डॉ. पाटील या करीत आहेत. आमच्या भागात दर महिन्याला एक शिबिर आयोजित करण्याचा आम्ही विचार करीत आहोत. रुग्णालयाने आम्हाला सहकार्य करावे.''

सातवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करून माध्यमिक शाळेत पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या डेरवण परिसरातील मुलींना प्रोत्साहन म्हणून दरवर्षी मनगटी घड्याळे बक्षीस दिली जातात. या वर्षी जि. प. शाळा, डेरवण नं. १मधील दोन, हडकणीमधील चार आणि मांडकीमधील बारा विद्यार्थिनींना अध्यक्षांच्या हस्ते ही बक्षिसे देण्यात आली. कु. वैदेही यादव (डेरवण), कु. सलोनी भुवड (हडकणी) आणि जान्हवी खांबे (मांडकी) यांनी आपली कृतज्ञता व्यक्त केल्यानंतर सभेच्या मुख्य कार्यक्रमाला, माननीय वक्त्यांच्या व्याख्यानांना प्रारंभ झाला.

डेरवण रुग्णालयाच्या वैद्यकीय संचालक डॉ. सुवर्णा पाटील सर्वप्रथम बोलताना म्हणाल्या, ''सामान्यपणे एखाद्या महापुरुषाचे नाव रस्त्याला दिले किंवा त्याची मूर्ती म्हणून गाभाऱ्यात स्थापना केली की आपण सर्व सामान्य माणसे मोकळे होते कारण महान सत्पुरुष हे देव आहेत, आणि आम्ही तर सामान्य माणसे, तेव्हा आम्ही तुमचा आदर्श पाळायला अपुरे आहोत हे आधीच सांगून टाकले जाते आणि आपण कर्तव्यापासून परावृत्त होतो पण महाराजांनी मात्र असे होऊ दिले नाही आणि एक अशी संस्था निर्माण केली जी छत्रपती शिवरायांच्या सुराज्याचे संगोपन आणि संवर्धन करेल.

छत्रपतींनी चार स्तंभांवर स्वराज्य चालवले त्यात सत्य, नीती, न्याय, स्त्रीचा सन्मान आणि अब्रू. अगदी हीच चतुःसूत्री घेऊन श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट आपले मार्गक्रमण करत आहेत.

ध्यायतो विषयान्पुंसः सङ्गस्तेषूपजायते। सङ्गात् संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते।।

क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः। स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति।।

म्हणून विषयात अडकलेल्या समाजाला सन्मार्गाला लावण्याकरिता ही संस्था परोपरीने प्रयत्न करत आहे आणि म्हणूनच मागेल त्याला काम उपलब्ध करून स्वावलंबी करणे आणि हा स्वावलंबनाचा मार्ग सुकर व्हावा म्हणून शिक्षण आणि तेसुद्धा एकाच पठडीत न राहता वैविध्यपूर्ण म्हणजे वैदिक अभ्यास ते वैद्यकीय, पॅरामेडिकल, स्पोर्ट्स, सायन्स ज्यात अगदी के. जी. ते पी. जी. अशा सर्व संधी परवडतील अशा फीमध्ये तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोचवल्या जात आहेत .

किशोरी मुली आणि स्त्रिया यांच्या उत्तम भवितव्यासाठी अगदी खोलवर विचार करून त्यांना आत्मविश्वास, आरोग्य, अनुभव, आहार उपलब्ध करून अभिमानाने जगणे शिकवले जाते. त्याकरिता सुकन्या योजनेमार्फत व्यवसायाभिमुख कौशल्य विकास, शिक्षण, वैद्यकीय उपचार अशी सूत्री राबवली जाते आणि पुन्हा एकदा छत्रपती शिवरायांचा स्त्रियांबद्दलचा आदर सध्याच्या समाजव्यवस्थेतही टिकून राहावा याकरिता संस्थेचे प्रयत्न अधोरेखित होतात.

समाजाला आलेली मरगळ दूर करण्यासाठी जसे समर्थ रामदास स्वामींनी मनाच्या श्लोकांची रचना केली त्याप्रमाणे



*अध्यक्ष श्री. रमेश पतंगे यांचा सत्कार करताना श्री. विकासराव वालावलकर*

मुळातच तरुण मुले मनाने आणि शरीराने बलवान व्हावीत ह्या उद्देशाने SVJCT स्पोर्ट्स अर्कडेमीची स्थापना आपल्या गुरूंचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी काकामहाराजांच्या संकल्पनेतून आणि श्री. विकास वालावलकरांच्या आर्थिक पाठबळातून केली गेली आणि तीही एका खेड्यात जिथे मुलांना ऑलिम्पिक दर्जाच्या सोयी मिळणे केवळ स्वप्नवत होते अशा ठिकाणी. आणि आज आपण पाहत आहोत की हजारो मुले खेळाडूंच्या कुंभमेळ्याला आली आहेत, मनसोक्तपणे आपल्या खेळाचे उत्तम प्रदर्शन करून राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर आपला ठसा उमटवत आहेत आणि हेच मावळे आपल्या भारत मातेचे नाव उज्वल करतील अशी खात्री आहे!

छत्रपती शिवाजीमहाराज वयाच्या १५व्या वर्षी शपथ घेतात आणि राजगड किल्ला बांधायला घेतात आणि सर्व किल्ल्यांची पुनर्बांधणी करितात ही अशी दूरदृष्टी आणि भविष्यासाठीची तयारी याविषयी ते इतक्या बालवयात विचार करू शकतात हा खरे तर दैवी चमत्कार आहे आणि अशा प्रकारे सद्यघडीला समाजाला स्वावलंबी करायचे तर हीच दूरदृष्टी ठेवून त्यांना अध्यात्म, सत्संग, शरीर सौष्ठव, शिक्षण याकरिता अनेक उपक्रम संस्थेने हाती घेतले आणि सर्वांना शहाणे करून सोडले आहे.

रूढी परंपरा यातून बाहेर पडायचे असेल तर विज्ञानाची कास धरूनच ते करणे अपेक्षित आहे आणि आपल्या समस्यांचे आपणच उपाय शोधले पाहिजेत ह्याकरिता आपण वैज्ञानिकदृष्ट्या स्वावलंबी होणे आवश्यक आहे आणि त्याचा पाया म्हणून एका दूरदृष्टीने इथे संशोधनाचा डोलारा उभा केला आहे आणि हे संशोधन परिपूर्ण व्हावे म्हणून उच्च दर्जाची यंत्र सामुग्री उपलब्ध केली गेली आहे याचेच एक उदाहरण म्हणजे डॉ. सुनील नाडकर्णी आणि शास्त्रज्ञ ऋता मुल्हेरकर याच्या संकल्पनेतून साकारलेल्या प्रोजेक्टमध्ये मणक्यातील घसरलेली चकती / डिस्क जी पाठदुखीला कारणीभूत आहे ती दुर्बिणीने बाहेर काढून तीच चकती प्रयोगशाळेत पुन्हा निर्माण करून पुन्हा त्याच रुग्णाच्या मणक्यात तिचे रोपण केले गेले ही नक्कीच एक ऐतिहासिक घटना आहे. आजपर्यंत अशा प्रकारचे संशोधन भारतात झाल्याचे आमच्या वाचनात नाही .



*श्री. प्रदीप वसंत शिळीमकर यांचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार*



*प्रमुख वक्त्या सौ. सायली गोडबोले-जोशी यांचा सत्कार करताना श्री. विकासराव वालावलकर*

याशिवाय कुपोषित व्यक्तींनाही मधुमेह आजार होऊ शकतो आणि अशा undernourshed diabetic पेशंट्समध्ये इन्सुलिन रेझिस्ट्न्स नसून किंबहुना इन्सुलिनची कमतरता असते हे नावीन्यपूर्ण संशोधन सर्व शास्त्रज्ञांचे लक्ष आकर्षित करीत आहे आणि त्यावर शिक्कामोर्तब करण्याकरिता आता nextgene sequencingद्वारे gene वरील पॉलीमॉर्फिसम defects जिनोमिकवरील शास्त्रज्ञ डॉक्टर नीलम शिरसाट शोधत आहेत, ज्यामध्ये डायबेटीसकरिता कोणता



*श्री. अनंत संभाजी फोंडके यांचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार*



सौ. दीपमाला दीपक नाटुस्कर यांचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार



सातवी उत्तीर्ण विद्यार्थिनीला मनगटी घड्याळ बक्षीस

जनुकीय दोष कारणीभूत आहे हे कळणार आहे. त्याचप्रमाणे कॅन्सर होण्याकरिता कोणते बदल डीएनएमध्ये होतात आणि जन्मजात व्यंग आणि त्याचे डीएनएमधील बदल हे शोधायचे काम डेरवणमध्ये होणार आहे. साधारणतः, अशी तंत्रज्ञाने केवळ पंचतारांकित संस्थांमध्ये उपलब्ध होतात, तीसुद्धा उच्चभ्रू समाजासाठी! पण डेरवणमध्ये वंचित समाजाला हे उपलब्ध करण्यात आले आहे हे विशेष.

शिवाय ह्या सगळ्या आजारांचा उगम हा किशोरी मुलींच्या आरोग्यावर अवलंबून आहे कारण ती भावी पिढीची माता आहे हे निदर्शनास आल्यामुळे सर्व भारतातील संशोधकांना एक नवी योग्य दिशा प्राप्त झाली आहे. हाच संशोधनाचा धागा उलगडण्यासाठी बिल अँड मिलिन्डा गेट्स फौंडेशननेही संशोधनासाठी भरघोस आर्थिक पाठबळ आणि टाटा इन्स्टिट्युट ऑफ फंडामेंटल रिसर्चने तांत्रिक सल्ला देण्याचे मान्य केले आहे.

महाराजांची दूरदृष्टी अशी आहे की ती गोरगरिबांचे उत्थान करण्यासाठी cutting edge लेटेस्ट टेक्नॉलॉजीही ह्या वंचित समाजाला उपयोगी व्हावी आणि तीसुद्धा माफक दरात; म्हणून न्युक्लिअर मेडिसिन, पेट-स्पेक्ट स्कॅन, फ्लोसायटोमेट्रीची स्थापना केली गेली. ही फार मोठी झेप संस्थेने घेतली आहे आणि त्यामुळे कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराशी लढण्याची क्षमता निर्माण झाली आहे.

स्मार्ट village initiativeतर्फे ICMR ने संपूर्ण भारत देशातून फक्त ६ वैद्यकीय महाविद्यालयाना नामांकन दिले त्यात वालावलकर रूरल मेडिकल कॉलेज हे एक महाविद्यालय या प्रोजेक्टसाठी पात्र ठरले आहे ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे कारण ज्यामुळे दऱ्याखोऱ्यात निवास करणाऱ्या रुग्णांना डिजिटल हेल्थ पुरवली जाणार आहे.

संस्थेच्या कामकाजात असलेली पारदर्शकता आणि नवनवीन उपक्रम सुरू करून शिक्षणाचा दर्जा वाढवण्यासाठीची दुर्दम्य इच्छाशक्ती पाहून अनेक परदेशी शास्त्रज्ञ आणि डॉक्टर्स आकर्षित होत आहेत. त्यामध्ये आता भारतातील वैद्यकीय शिक्षणाचा क्लिनिकल experince घेण्याकरिता इंग्लंडहून trainee डॉक्टर्स इंटर्नशिप्ससाठी दाखल होत आहेत. वैद्यकीय शिक्षणाची उंची आणि कौशल्य वृद्धिंगत व्हावे म्हणून कॅडेव्हेरिक डेड बॉडीवर ट्रेनिंग देण्याकरिता डॉक्टर प्रशांत मूल्या यांनी एक नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान विकसित करून ह्या उपक्रमाला गती दिली आहे त्यामुळे आता देशभरातून डॉक्टर्स ट्रेनिंगसाठी डेरवणमध्ये आपली वर्णी लावत आहेत.

कुपोषणाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी 'आहारक्रांती'चे परोपरीने प्रयत्न त्यातूनच जंक फूडला पर्याय म्हणून millet based खाद्य पदार्थ तयार होत आहेत. व्यवसायाभिमुख शिक्षण देऊन सर्वांना आत्मसन्मान राखण्याकरिता मदत केली जात आहे. शेवटी एव्हढंच म्हणावंसं वाटतं की 'अयं निज: परो वेति गणना लघुचेतसाम । उदारचरितनां तु वसुधैव कुटुंबकं ।' हे तुझे, हे माझे अशी संकुचित विचारसरणी इथे नाही तर हे सर्व जगच माझे कुटुंब आहे आणि सर्वे सुखिनः संतू ह्या भावनेने ही संस्था आपले कार्य करीत आहे.

यानंतर माजी कृषिमंत्री मा. शशिकांतभाऊ सुतार आपले विचार व्यक्त करताना म्हणाले, ''१९८४पासून येथे मोठ्या प्रमाणावर शिवजयंती साजरी होत आहे, आणि प्रत्येक वर्षी मी येथे उपस्थित राहत आलो आहे. या उत्सवाच्या निमित्ताने प्रत्येक वेळी भक्तश्रेष्ठ वालावलकर साहेबांची आठवण येते. पूर्वी सायंकाळी सावर्ड्यापासून भर उन्हात ४.०० वाजता मिरवणूक निघायची आणि स्त्री-पुरुष, लहान मोठे सगळे अनवाणी सामील व्हायचे. रात्री ११.०० वाजेपर्यंत चालणारी अशी भव्य मिरवणूक अन्यत्र कोठेही पाहायला मिळणार नाही. निष्कलंक चारित्र्य आणि नि:पक्षपणे कारभार चालविणारे छत्रपती शिवाजीमहाराज हे एकमेव राजे आहेत. ज्यांनी इतिहास घडवला असे अनेक राजे विस्मृतीत गेले. पण शिवरायांची आज



*सत्काराला उत्तर देताना श्री. प्रदीप वसंत शिळीमकर*



*हडकणी शाळेची कु. सलोनी भुवड आपल्या भावना व्यक्त करताना*

४०० वर्षे झाल्यावरदेखील घराघरात पूजा होत असते. प्रत्येकाच्या मनात त्यांच्याविषयी आदराचीच भावना आहे आणि आपण त्यांचे आदर्श लक्षात ठेऊनच वागत असतो. छत्रपतींचे एक मंदिर फक्त सिंधुदुर्गात आहे आणि दुसरे डेरवण येथे! बाकी अन्यत्र कोठेही त्यांचे मंदिर आढळणार नाही. श्रीसहजानंदसरस्वती महाराजांच्या मनात बालपणापासूनच छत्रपतींचे स्मारक उभे करण्याचे विचार होते. आणि योग्य वेळी येथे गोव्याचे श्री. पाटकर आणि त्यांचे कुटुंबीय यांना सोबत घेऊन श्रीमहाराजांनी हा भव्य किल्ला आणि हे स्मारक उभे केले. त्या वेळी रस्ते, पाणी, वीज अशा कसल्याही सुविधा नव्हत्या. विशेष म्हणजे स्थानिकांचे सहकार्य अजिबात नव्हते, सरकारचे तर सोडूनच द्या! अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य यापासून सामान्य माणूस दूर होता. पण श्रीमहाराजांनी येथे हे स्मारक उभे केले. छत्रपतींच्या आयुष्यातील प्रसंग अत्यंत जिवंतपणे येथे साकारलेले आहेत. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेचा प्रसंग पाहून, छत्रपतींना महिलांविषयी कसा आदरभाव होता हे लक्षात येते. रांझ्याच्या पाटलाने गैरवर्तन केले म्हणून श्रीशिवाजीमहाराजांनी त्याचे हातपाय छाटून टाकले. मातोश्री जिजाबाईंनी विचारले की त्याला मृत्युदंड का दिला नाहीस? तेव्हा महाराज म्हणाले की तो मेल्यावर काही दिवसांनी ही गोष्ट विस्मृतीत गेली असती. पण हा प्रसंग दीर्घकाळ लोकांच्या समोर राहू दे!''

किल्ल्यातील अनेक शिल्पात साकारलेल्या अनेक प्रसंगांचे मर्म सांगून ते पुढे म्हणाले, ''आता लोक डेरवणचा उल्लेख 'श्रीक्षेत्र डेरवण' असा करितात. आज अखंड महाराष्ट्रातून असंख्य लोक येथे येतात आणि स्फूर्ती घेऊन, प्रेरणा घेऊन जात असतात. २० मार्च १९८४ रोजी उद्घाटन समारंभात मा. शिवाजीराव भोसले म्हणाले होते की श्रीमहाराजांनी हे पवित्र क्षेत्र निर्माण केलेले आहे. मा. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते की श्रीमहाराज हे सनातन वैदिक धर्मात जागृती करण्याचे महान कार्य करीत आहेत. त्यांचे आशीर्वाद आम्हाला लाभतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला होता. त्यानंतरच शिवसेना महाराष्ट्रभर वाढली, हा इतिहास आहे. छत्रपती श्रीशिवाजीमहाराज हे शंभूमहादेवाचा अवतार आहेत. शतकानुशतके त्यांचे स्मरण राहावे म्हणून त्यागाधिष्ठित धर्माचरण हाच एक मार्ग आहे. हे लोकांच्या मनावर ठसविण्यासाठी ही शिवसृष्टी उभारलेली आहे. भारतीय संस्कृती विश्ववंद्य का आहे हे शिवसमर्थ गड पाहून तरुण पिढीला समजावे यासाठी हे स्मारक उभे केलेले आहे. येथे तीन-तीन, चार-चार पिढ्या काम करणारे लोक आहेत. असे अन्यत्र कोठे पाहायला मिळत नाही. येथे भेदभाव नाही, उच्च-नीचपणा नाही. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सच्चाई आणि सेवावृत्तीने येथे काम चाललेले आहे. आपण परदेशांचे कौतुक करितो. पण येथे येऊन परदेशातील लोक स्फूर्ती घेऊन जातात! येथे प्रसिद्धिपराङ्मुख राहून कार्य केले जाते. पण हे सारे जगापुढे येणे आवश्यक आहे. श्रीकाकामहाराजांनी सर्वांना जवळ केले, अगदी विरोधकांनाही आपल्या कार्याने जवळ आणले. संस्थेच्या प्रगतीसाठी जे जे करणे आवश्यक आहे ते ते श्रीकाकांनी केलेले आहे. अनेक नामवंत लोक निरपेक्षपणे येथे येतात, कारण हे काम देश, देव आणि धर्माचे आहे. श्रीकाकामहाराजांचे प्रेम असेच सर्वांना सदैव लाभो अशी प्रार्थना करून मी येथेच थांबतो.''

आपल्या घणाघाती वक्तव्याने गेली अनेक वर्षे शिवजयंती सभेत श्रोत्यांना मोहून टाकणारे प्रा. सचिन कानिटकर बोलायला उभे राहिले की श्रोत्यांमध्ये चैतन्याची लाट पसरते. आपल्या भाषणात ते म्हणाले, ''इथं येणे हे मुळात सौभाग्यच आहे आणि ते सौभाग्य प्रतिवर्षी अनुभवायला मिळतं याचा खूप आनंद मिळतो. मंडळी, इथलं कार्य जे आहे ना ते मोहून टाकणारे कार्य आहे आणि त्यात किती प्रकारे जनमानसाला शिकवलं जातं बघा की त्यावर बोलत राहिलं तरी संध्याकाळपर्यंत बोलता येईल एवढं काम! आणि तरी काम संपणार नाही! म्हणजे इथं आरोग्य सुविधा दिली जाते. ती सुविधा कायमस्वरूपी दिली जावी याकरिता डॉक्टर तयार करणारे कॉलेज आहे, परिचारिका तयार करणारे कॉलेज आहे, फिजिओथेरपीचं



*''सर्वे सुखिनः संतू ह्या भावनेने ही संस्था आपले कार्य करीत आहे.''*
*– डॉ. सुवर्णा पाटील*



*''भारतीय संस्कृती विश्ववंद्य का आहे हे शिवसमर्थ गड पाहून तरुण पिढील समजावे यासाठी हे स्मारक उभे केलेले आहे.'' – मा. शशिकांतभाऊ सुतार*

कॉलेज आहे आणि प्राथमिक शाळेपासून ही घडवण्याची सुरुवात होते आणि हे सगळं करत असताना उत्तम दर्जाचा संशोधन होत आहे. तेही आता आपल्याला मॅडमनी सांगितलं. नाडकर्णी सर, मुल्हेरकर मॅडम यांनी निर्माण केलेलं संशोधन आपण अनुभवलं. अशी प्रतिवर्षी नवीन बातमी आपल्याला मिळत असते की यंदा संस्थेने काय प्रगती केली. आजारी पडूच नये म्हणून भलंमोठं क्रीडासंकुल! महाराजांचं सुराज्य दुसरं काय असतं सांगा मला? रेशनकार्ड पासून सगळ्या सुविधा, स्वस्त दरात धान्य, घरासाठी मदत. शिवजयंती कशी करावी यावर यशवंतराव मॅडम वगैरे बोलत होत्या मघापासून किंवा पाटील मॅडमनी पण म्हटलं की पुतळा उभा करून शिवजयंती होत नसते. आपण पुन्हा विसरून आपल्या कामाला लागतो.

नाही, इथली शिवजयंती म्हणजे वर्षभर केलेल्या कामाचा आढावा महाराजांना सादर करायचा दिवस आहे की तुमच्या प्रेरणेतून एवढे एवढे झालं! आपण जेव्हा आपापल्या घरात असतो तेव्हा भोवतालच्या भ्रष्टाचारांनी त्रस्त झालेलो असतो. वर्तमानपत्र रोज वाचायचं आणि एकमेकाला आपण सांगत असतो की काय चाललंय हो जगात! काहीही चाललेलं नाही! पण सुंदरही चाललं आहे. डेरवणला शिवजयंतीला या, म्हणजे समजेल आणि तिथल्या कार्यात सहभागी व्हा. तर देवाचं राज्य कुठं चालतं हे अनुभवायचं असेल तर इथे यायचं आणि त्याचा अनुभव आम्ही प्रतिवर्षी घेत आहोत, म्हणून आम्हाला खूप आनंद होतोय!

मला जो विषय आज सांगायची इच्छा झाली आहे ना तो सांगण्यापूर्वी आणखी एक छान आनंदाची बातमी देतो इथली. दरवर्षी इकडे येत असताना, संगमेश्वरला संभाजीमहाराजांना पकडलेले जे स्थान आहे, तिथे प्रार्थना करून आम्ही येतो की भगवंता, या स्थानाचा उद्धार व्हावा आणि यंदा वृत्तपत्रात गेल्या आठवड्यात बातमी आलेली की सरकारने तिकडे लक्ष दिलं, त्याला कारण चित्रपट झाला 'छावा' नावाचा. आणि तिथं प्रचंड मोठं बजेट सँक्शन केलं गेलं आहे आणि तो विकास होणार आहे. ९१ साली हा प्रयत्न सुरुवातीला काका महाराजांनी केलेला आहे. काही घटना त्वरित होत असतात. काही काही तपाने होत असतात. पण सातत्याने कार्य करिता राहायचं असतं हा इथला मंत्र आहे आणि हा मंत्र शोधायचा प्रयत्न आज थोडक्यात तुमच्यासमोर करणार आहे की शिवाजीमहाराज यशस्वी कसे झाले?

अहो शिवाजीमहाराजांच्या पावलावर पाऊल ठेवायचे! रामदास स्वामींनी सांगितले, ''शिवरायाचे कैसे बोलणे। शिवरायाचे कैसे चालणे। शिवरायाची सलगी देणे। कैसी असे।'' त्यांची नक्कल प्रत्येक बाबतीत करा. आणि त्याबाबतीत पावलावर पाऊल कोणी टाकलं असेल तर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी टाकलेलं आहे. तुम्ही बघाल इथं नेताजी पालकरांची शुद्धी करून घेतल्याचा देखावा आहे. सावरकरांनी शुद्धीसाठी आंदोलन चालवलं. मी सांगलीतसुद्धा सावरकरांनी मुस्लिमातले हिंदू झालेले शुद्ध झालेले हिंदू अनुभवलेले आहेत त्यांच्याशी बोललेलो आहे. हे सगळं सावरकरांनी पुढे घडवलं जे शिवाजीमहाराजांनी बीजारोपण नेताजी पालकराची शुद्धी करून केलेलं होतं. शिवाजीमहाराजांच्या अनेक योजना सावरकरांनी प्रत्यक्षात अस्तित्वात आणल्या आणि जातीय निर्मूलनाचं काम करत असताना रत्नागिरीत काही लोक जे कडवट होते ते म्हणायचे शेवटच्या बाजीरावाचं राज्य असतं तर या सावरकराला हत्तीच्या पायी दिला असता म्हणून. कारण सावरकर जे करायचे ते पचायचं नाही. त्याला सावरकरांनी उत्तर दिलं की शेवटचा बाजीराव कशाला, शिवाजीमहाराजांचं राज्य असतं तर याच कामासाठी मला त्यांनी हत्तीवर अंबारीतून मिरवलं असतं. त्यांच्या शाळेचे नाव शिवाजी स्कूलच आहे नाशिकमध्ये. तिथून ते 'शिवाजी'

शिष्यवृत्तीवरच परदेशात गेलेत. त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये आल्यानंतर १९०१ला सतराव्या वर्षी शिवाजीमहाराजांची आरती लिहिली. दर शुक्रवारी शिवाजीमहाराजांची आरती करायचे. म्हणजे इतकं शिवाजीमहाराजांशी मनापासून जोडलं गेलेले व्यक्तिमत्त्व आहे.

पण सावरकरांचा लढा बघितला आणि शिवाजीमहाराजांचा लढा बघितला तर तुम्हाला दोन फरक निश्चित दिसतील. शिवाजीमहाराज ३२ मण सोन्याच्या सिंहासनावर आरूढ झाले आणि सावरकरांना मात्र स्वातंत्र्यानंतरसुद्धा दोनदा तुरुंगवास भोगायला लागलेला आहे. एकदा पाकिस्तानचा पंतप्रधान लियाकत अली भारतात आला म्हणून त्यांना तुरुंगात ठेवलं होतं. त्याच्या आधी गांधीवधाचा आरोप ठेवून त्यांना तुरुंगात ठेवलेलं होतं. ज्या वेळेला चाफेकर बंधूतले दामोदर हरी चाफेकर फासावर गेले त्या वेळेला सावरकरांनी देवीसमोर प्रतिज्ञा केली की माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र युद्धात शत्रूस मारीत चाफेकरांसारखा मरेन किंवा शिवाजीसारखा विजयी होऊन माझ्या मातृभूमीच्या मस्तकी स्वराज्याचा राज्याभिषेक करेन. यापुढे देशाचे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा सेतू उभारून मी शत्रूला मारिता मारिता मरे तो झुंजेन ही त्यांची प्रतिज्ञा आहे. पंधराव्या वर्षी केलेली प्रतिज्ञा आहे आणि आयुष्यभर पाळली आहे.

आयुष्यभर पाळली आहे पण नेमकं पुढं तो जो अभिषेक आहे तिथपर्यंत सावरकरांची गाडी गेली नाही कारण दिल्लीला १५ ऑगस्टला ज्या वेळेला स्वातंत्र्य दिन साजरा झाला त्या वेळेस सावरकरांना आमंत्रण नव्हतं. त्यांनी या आनंदात स्वतःच्या घरावर तिरंगा आणि त्यांनी स्वतः सिद्ध केलेला भगवा झेंडा असे दोन झेंडे लावून स्वातंत्र्य दिन साजरा केला पण त्यांना सरकारने आमंत्रित केलं नाही! त्यांना विधानसभासुद्धा कधी बघायला बोलावलेलं नाही आणि छत्रपतींच्या राज्यात मात्र छत्रपती म्हणतील ते झालं. पुढे दक्षिण दिग्विजय घडला. नेमकं सूत्र, कुठे काय झालं याचा थोडासा शोध घ्यायचा मी प्रयत्न केला.

मंडळी दरवर्षी एक नवीन असं तत्त्व आपल्यासमोर मांडायचा प्रयत्न करत असतो आणि मांडून झाल्यानंतर असं वाटतं की आता पुढच्या वर्षी मी काय बोलायचं? सगळं बोलून झालं. पण घडतं असं की काहीतरी योजतो टिपतो पण ऐन वेळेला महाराज वेगळी स्फूर्ती देतात आणि माझा विषय शेवटी इकडे येत असतानाच ठरतो आणि तो तुमच्यासमोर मांडतोय.

इकडे येत असताना तुम्ही जर संगमेश्वरमार्गे आला तर माखजन नावाचं गाव आहे. तिथल्या सदाशिव राजाराम रानडे यांनी सावरकरांचं त्यांच्या हयातीत पहिलं चरित्र लिहिलं. हे प्रकाशित होताना सावरकर साधारण ४१ वर्षांचे होते आणि सावरकरांना त्यांनी रत्नागिरीतल्या तुरुंगात बघितलं होतं. रत्नागिरीच्या तुरुंगात



''..सातत्याने कार्य करिता राहायचं असतं हा इथला मंत्र आहे ..'' – प्रा. सचिन कानिटकर'

म्हणजे अंदमानमधून सोडल्यानंतर त्यांना दोन वर्षं रत्नागिरीच्या तुरुंगात ठेवलं होतं आणि तिथं हे त्या तुरुंगातल्या कैद्यांनी तयार केलेले कापड घ्यायला म्हणून गेले होते. आणि त्या वेळेला फटीतून आत पाहिलं तेव्हा एक कृश चष्मेवाला कैदी बोलत असलेला दिसला. त्या वेळी उरलेले दोन कैदी कुजबुजले की सावरकरांची तब्येत आता जरा बरी दिसते आहे! तेव्हा त्यांना कळलं की आपण ज्यांना बघतो आणि ज्यांची गाणी स्फूर्तीने गातो ते सावरकर हेच बरं का! आणि तेव्हा त्यांच्या मनात आलं की त्यांचं चरित्र आपण लिहायचं आणि मग सावरकर तुरुंगातून सुटल्यावर त्यांना रत्नागिरीतच स्थानबद्ध ठेवलं होतं. त्यामुळे सावरकरांकडे जाऊन, त्यांच्या भावांकडे जाऊन यांनी माहिती गोळा करून त्यांचं पहिलं चरित्रं लिहिलं. संक्षिप्त चरित्र म्हणून आणि त्या चरित्राचं वाचन नुकतंच माझ्या हातून घडलं आणि मला एक अतिशय महत्त्वाची गोष्ट वाचनात आली.

सावरकर आणि त्यांचं काव्यं याचा विचार केला की वयाने पोक्त, ज्येष्ठ अशा व्यक्तीने लिहिलेली ती काव्य वाटतील पण गैरसमज दूर करा मनातला. वयाच्या २३व्या वर्षीं ते लंडनला गेलेले आहेत आणि तिथे सहा वर्षांत त्यांना अटक झाली आहे १३ मार्च १९१० ला. 'ने मजसी ने', 'अनादी मी अनंत मी' या सगळ्या कविता २३ ते ३० यातल्या आहेत. सव्वीस वर्षं, सत्तावीस वर्षं वयातल्या. त्यांचं चिंतन किती पोक्त होतं आपल्याला लक्षात येईल आणि त्यांच्या आयुष्यात ती जी १९१०ला अटक झाली त्या वेळेस सावरकरांचे वय होतं सत्तावीस वर्षं.

इंग्रजांनी १८५७च्या लढ्यानंतर आपल्या देशात आपल्या बांधवांना ठार मारून त्यांची प्रेतं इंग्रजांनी झाडावर टांगून ठेवली होती. त्या इंग्रजांना दाखवायचं होतं की तुझ्या भूमीत येऊन तुझं रक्त सांडायची हिम्मत या भारतमातेच्या पुत्रात आहे आणि त्या पद्धतीने सावरकर तिथे गेले आणि मदनलाल धिंग्राने करजन वायलीला

ठार मारलं. सावरकरांच्या मागे पोलिसांचा ससेमिरा लागला. देशभक्तीची गीतं प्रकाशित केली म्हणून बाबाराव सावरकरांना इथून अंदमानला तुरुंगात पाठवलं. घरावर जप्ती आणली. जॅक्सनचा वध झाला तो बाबारावांना अटक झाली म्हणून झाला. त्या बातम्या तिकडे सावरकरांना मिळत होत्या की आपल्या घराची धूळधाण झालेली आहे आणि आपल्यालासुद्धा कुठल्याही क्षणी आता अटक होईल आणि अशा अवस्थेत त्यांच्या सगळ्या कार्यकर्त्यांनी त्यांना फ्रान्समध्ये पाठवले आणि फ्रान्समध्ये पाठवल्यानंतर ते तिथं सुरक्षित होते कारण इंग्रजांचं राज्य नव्हतं आणि एका बागेत ते गेले तिथे क्रीडानदी तयार केली होती, त्यातले पक्षी वगैरे बघत होते आणि ते बघत असताना हरदयाळ नावाचे देशभक्त त्यांच्याबरोबर होते आणि त्यांच्या खिशात मराठी वृत्तपत्र होतं. ते वृत्तपत्र त्यांनी काढून बघितलं आणि त्यात वाचत असताना इकडची सगळी हालाखीची अवस्था त्यांना कळली. की इकडे काय काय झालंय आणि त्या वेळेला सावरकरांच्या मनात जे विचार आले ते लेखकाने लिहिलेत की माझ्या परमप्रिय स्नेह्यांवर, जीव की प्राण असलेल्या धाकट्या भावावर, सहकारी सवंगड्यांवर, लाडक्या शिष्यांवर, पूज्य देशभक्तांवर देशात हे प्रसंग हे छळ हे बंदीवास गुजरत असतात मी येथे क्रीडा नदीवर पक्षांची व फुलांची सुंदरता पाहत रमतो आहे ना. माझ्या उद्देशाने प्रेरित होऊन माझ्या शब्दांबरोबर आपल्याला प्राण देणारे हे माझे आप्त इष्ट बांधव तिकडं जाच छळ सोसीत असताना तुरुंगातील अंधारातून अन्नाशिवाय कुजत पडलेले असताना मी पॅरिसमधील शुद्ध सुगंधित वायू सहन करून खोल खोल श्वासोच्छवास करत फिरावे? हाय हाय! त्यास हे कळले तर ते मला नीच म्हणणार नाहीत काय?

मादाम कामा सांगत होत्या, श्यामजी कृष्ण वर्मा सांगत होते. श्यामजी कृष्ण वर्मांनी सांगितलं की अरे तू आमचा नेता आहेस, तू उगीच असा विचार करून जाऊन तुरुंगात सापडून सडायचं कारण नाहीये. तू इथं राहा. निर्भयपणे राहा. कारण तुझ्या नेतृत्वाखाली आम्ही लढा देणार आहोत. जाणाऱ्या लोकांची काळजी करू नको पण सावरकरांना ते पटेना. ते म्हणाले की असं बोलणं ऐकायला मिळालं की मला अधिकच लाज वाटायची आणि जे तोंडावर फौजेत धरले गेले त्यास शिपाई म्हणावे आणि आपण जे मागं कातडं बचावून राहतो त्याला नेता म्हणावं असला जनरल काय कामाचा! सावरकर म्हणतात आणि मग हे त्यांना मनाला बरं वाटेना मी तोंडावर जातो. धक्काधक्कीत गोळा सुटून पुन्हा जिवंत आलो तर जनरल म्हणवीन आणि मागे राहीन. सगळ्यांनी मोडता घातला पण यांनी मी जातोच म्हणाले आणि ट्रेनमध्ये बसले आणि ट्रेन लंडनला येता क्षणी त्यांना अटक झाली. आणि पुढचा इतिहास तुम्हाला माहीत आहे की ते अंदमानात गेले. मग म्हणाल हा सगळा प्रसंग आम्हाला का सांगताय? सूत्र तुम्हाला काय कळलंय?

तर तसाच प्रसंग आहे बाजीप्रभू देशपांड्यांचा. ज्या वेळेला शिवाजीमहाराज पन्हाळा सोडून विशाळगडाकडे निघाले होते. त्या वेळेला पहिल्यांदा पाठलाग चुकवत असताना शिवा काशीद यांनी शिवाजीमहाराजांची वस्त्रं घालून स्वतःचं प्राणार्पण केलं, का तर शत्रूचा खोळंबा करायचा म्हणून. शत्रू अधिक संतापला आणि घोड्यावरनं मागं आला. शिवाजीमहाराज पायी चाललेले होते विशाळगडाकडे. पांढरपाणी नावाचं गाव आहे तिथला ओढा. तिथंच ती घोडखिंड. तिथपर्यंत महाराज येऊन पोहोचले तोवर मागनं शत्रू यायला लागलाय. महाराजांबरोबर रात्रभर पावसात चालून दमलेले बांदलांचे सहाशे लोक आहेत आणि या बांदलांचे प्रमुख कारभारी जे आहेत ते आहेत बाजीप्रभू. त्या वेळेला बाजीप्रभू पुढे होतात आणि म्हणतात महाराज शत्रू जवळ आलेला आहे. आता सापडण्यात अर्थ नाही, नाहीतर सगळं आपण जे दिव्य केलं रात्रीपासून ते वाया जाईल. महाराज तुम्ही इथनं सुटा. मी तीनशे जणांना घेऊन या खिंडीत थांबतो. प्राण असेपर्यंत लढतो. एक एक शत्रू पुढे सोडणार नाही. महाराज तुम्ही निघा. आता सावरकरांना थांबा म्हणून सांगत असताना निघायची जी इच्छा झाली ती शिवाजीमहाराजांना झाली नसेल काय? महाराज लढवय्ये होतेच. त्याला वेगळ्या पुराव्याची आवश्यकता नाही. अफजलखानाला शिवाजीमहाराज स्वतः भेटले होते. साठ हजार सेना सागरात, लाल महालात शिवाजीमहाराज स्वतः घुसले होते. कल्पना करा, या दोन्ही लढाया निर्णय जर उलटा लागला असता तर? आपल्याला आपला नेता मिळाला नसता. हे सुराज्य बघायला मिळालं नसतं. आज धर्म बघायला मिळाला नसता. बाजीप्रभू म्हणाले महाराज तुम्ही या मोहात पडू नका की आम्हा सहकाऱ्यांचं काय होईल. अहो लाख मेले तर चालतील लाखांचा पोशिंदा मरता कामा नये. तुम्ही पुढं चला. ऐन वेळेला कुठलंही कार्य करत असताना आप्तांचा मोह ही मोठी एक शृंखला आपल्या पायात येत असते. शिवचरित्रातून आदर्श घेत असताना आपण ती शृंखला सुद्धा तोडायला शिकलं पाहिजे.

महाराजांच्या चरित्रातुन शिकायला मिळतं. दिगंबरदास महाराजांचा नियम आहे की अमुक वाजल्यानंतर आत कुणाला प्रवेश नाही. काकामहाराज शेजारी असताना नेमक्या त्यांच्या पत्नी बाहेर आलेल्या असतात. महाराज सांगतात कोणाला आत घ्यायचं नाहीये. त्यांना तू जाऊन सांग. नवऱ्याला सांगतात की बायकोला तुला आत प्रवेश नाही म्हणून सांगायचं. काकामहाराज मोहावर मात करून तिथे जाऊन सांगतात की आत्ता आत येता येणार नाही. अमुक वाजल्यानंतरच आत प्रवेश. हा मोह, हा मोह तोडल्यानंतरच यश मिळतं!''

प्रा. कानिटकर यांच्यानंतर प्रमुख वक्त्या सौ. सायली

गोडबोले जोशी यांनी आपले विचार मांडले. त्या म्हणाल्या, ''....माउली म्हणतात, 'तो वक्ताची नव्हे श्रोतेवीण।' मला कल्पना आहे की माझ्या आधी बरेच वक्ते बोलून गेलेले आहेत आणि तरीही श्रोत्यांची कुठेही चुळबुळ नाहीये! तर हे उत्तम श्रोत्याचे लक्षण आहे आणि आत्ता जसं सचिनदादांनी सांगितलं मी तेच कथासूत्र पुढे धरून माझ्या विषयामध्ये प्रवेश करते. आधी कथा सांगते आणि मग माझ्या विषयाकडे वळते.

कथा तीच बाजीप्रभू देशपांडे यांची. जो पुढचा संदर्भ मी सांगते हे काही माझ्या मनचे संवाद नाहीत. इतिहास संशोधिका म्हणून काम करताना मला याची पूर्ण कल्पना आहे की इतिहास आपल्या मर्जीने लिहायचा किंवा सांगायचा नसतो. तो जसा असतो तसाच सांगायचा असतो. तर 'देशपांडेंची कैफियत' याच्या मधला हा प्रसंग आहे. बाजीप्रभू आणि फुलाजी प्रभू तेथे धारातीर्थ पडले पण त्यांच्याबरोबरचे जे देशपांडे जे आप्तेष्ट होते त्यांच्यामार्फत ज्या कथा त्यांच्या वंशजांकडे पुढे आल्या त्या कथेतला हा भाग सांगते. आपल्याला इथपर्यंतची कथा ठाऊक आहे. बाजीप्रभू म्हणाले की लाख मेले तरी चालतील लाखांचा पोशिंदा जगायला हवा.
तरी ऐकतील तर ते महाराज कसले. महाराज सांगत होते की बाजी, जर तुम्हा सहकाऱ्यांना इथे मृत्यूच्या खाईत लोटून आम्ही पुढे गेलो तर आई जगदंबा आणि शंभू महादेव हसेल आम्हाला. वेळ वैऱ्याची आहे. रात्रीपासून आपले सगळे मावळे अत्यंत श्रमून थकून गेलेले आहेत. आज जे व्हायचं असेल ते या खिंडीत सगळ्यांचं एकत्रच होऊ दे. वेळ फार अवघड आहे. एवढ्या चर्चा वगैरे करायला वेळ नाही. असा एकंदरीत त्या प्रसंगाचा आवेश बघा.

धुवांधार पाऊस आहे. आषाढाचा महिना चालू आहे. . सगळा डोंगराळ प्रदेश आहे. डोंगराच्या दऱ्याघाटांमधून हा प्रवास चालु आहे. आणि अशा वेळेला घोड्यावरून बसून सिद्दी मसौद महाराजांचा पाठलाग करत पुढे येतोय. आणि एवढ्या चर्चा करायला समजुती घालायला वेळ नाही. सोळाव्या शतकाचा काळ आहे. लोकं फार भाबडी आहेत. फार भाबडी आहेत आणि बाजीप्रभूंनी शपथ घातली आहे. आणि शपथ घालताना ते एका प्रसंगाचा उल्लेख करितात. ते म्हणतात की महाराज मी तुमच्यापेक्षा वयानं वडील. वडीलकीच्या अधिकारात सांगतो ज्या वेळेला मी पहिल्यांदा स्वराज्याच्या सेवेत दाखल झालो तेव्हा, सल्लागार पदाच्या ज्या प्रमुख आहेत त्या राजमाता आऊसाहेबांनी आम्हास एकच प्रश्न विचारला की इमान कोण जातीचं आणि आम्ही सेकंदाचा अवसर न दवडता उत्तर दिलं की आईसाहेबांच्या पायाशी लेकराच्या जातीचं. किती सुंदर उत्तर आहे बघा! आणि बाजीप्रभू महाराजांना सांगताहेत की उद्या जर या सगळ्या युद्धाच्या धुमश्चक्रीमध्ये देव नको करो पण असं घडलंच की माझा प्राण राहिला आणि महाराजांचा गमवावा लागला तर आऊसाहेबांच्या पुढे काय तोंड घेऊन जाऊ आणि सांगू की धाकटा बंधू तिथेच शहीद झाला आणि मी मात्र मुजऱ्याला तुमच्यापुढे आलेलो आहे. हे चालणार नाही महाराज आणि तुम्हाला आऊसाहेबांची शपथ आहे. हे स्वराज्याचे स्वप्न बघणाऱ्या तुमच्या आबामहाराजांची शपथ आहे. तुम्हाला पुढे जावंच लागेल.

आणि मी माझ्या मुख्य विषयाकडे वळते. मघाशी ताईंनी सुरुवातच अशी केली की आज देशाला जिजाऊंचा शिवबा हवा आहे. खरं तर शिवबा जिजाऊंचाच आहे. आणि माझा मागचे वीस पंचवीस वर्ष संशोधनाचा विषय हा राजमाता आऊसाहेब आहे. एक स्त्री म्हणून मला या गोष्टीचा सार्थ अभिमान आहे की राजमातांसारखी आई या राष्ट्रामध्ये निर्माण झाली म्हणून युगप्रवर्तक शककर्ता राजा या देशाला मिळाला. एक नाही तब्बल दोन छत्रपती या मातेने या समाजाला प्रदान केले. इतिहास आपल्याला ठाऊक आहे. आत्ता धर्मवीर छत्रपती संभाजीमहाराजांचा उल्लेख झाला. त्यांच्या जन्मदात्या मातोश्री फलटणच्या नाईक निंबाळकर यांच्या महाराणी सईबाई या शंभू बाळांच्या वयाच्या अडीचाव्या वर्षी मृत्युमुखी पडल्या तिथून पुढे शंभू बाळांचा सगळा प्रवास; मी शारीरिक म्हणत नाही, मी संस्कृतिक आणि संस्काराच्या दृष्टीने म्हणते, तो नात्याने आजी असलेल्या जिजाऊसाहेबांच्या समर्थ नेतृत्वाखाली झाला आणि म्हणून असे दोन छत्रपती या मातेमुळेच या समाजाला मिळाले.
आजकाल बऱ्याच ठिकाणी हे वाचायला मिळतं; अगदी रिक्षाहूडपासून वाट्टेल त्या ठिकाणी, की राजे पुन्हा जन्माला या. इतकी सोपी गोष्ट वाटते!

एक कथा सांगते जी आहे सिंदखेड जाधवरावांच्या बखरीतली. मी कालपासून प्रेझेंटेशन ऐकलं. आत्ता सुवर्णा मॅडमचं बोलणं ऐकलं. 'सुकन्या योजना' फार छान उपक्रम आहे. आपण २१व्या शतकातले प्रगत लोक आहोत आणि आपल्यासारख्या प्रगत लोकांना आज या समाजाला कायदा करून सांगायची वेळ येते की स्त्री भ्रूणहत्या रोखा. मुलगी जन्माला येऊ द्या. लाजिरवाणी गोष्ट आहे ही आणि मी म्हणते असतील आमचे लखोजीराव आणि म्हाळसाबाई अंधश्रद्धाळू. कारण पंधराव्या शतकाच्या शेवटीशेवटी घरामध्ये तीन मुलगे असताना ते कुलस्वामिनी रेणूकेला नवस बोलत होते की आई तुझं रूप अंगणात खेळू दे. तुझं नाव ठेवू तिला आणि ती मायभवानी रेणुका त्यांना प्रसन्न झाली आणि बखरकार लिहितात की महालाचे नैऋत्य कोनेला राणी म्हाळसाउच्या पोटी साक्षात कुलस्वामिनी जगदंबा उपजली. कन्येस ज अक्षर अत्यंत लाभते तेव्हा कन्येचे नाव 'नित्य जयंती सा जिजा' म्हणजे जी नेहमी जिंकते ती 'जिजा' ठेवा आणि लखुजीराव खुश झाले. कारण हा जो यदुकुलाचा वारसा आहे ना तो प्रत्यक्ष श्रीकृष्णाच्या यदुकुलाचा वारसा आहे आणि लखोजीराव म्हणतात की मला माझी मुलगी

अशीच हवी होती की जी पांडवमाता कुंती, वीर अभिमन्यूमाता सुभद्रा यांच्या तोडीची असेल. आमच्या यदु कुलक कन्या कोणी साध्यासुध्या नाहीत. आपण मघासपासून बरेच उल्लेख ऐकले. अगदी त्यात धर्मयुद्धामध्ये ज्या कृष्णाने अर्जुनाला उपदेश केला त्या वीरप्रसवा मातेचं काय. एक सोडून पाच-पाच पुत्र माता ती प्रसवली. ती यदु कुलकन्या होती आणि ज्यांच्या जयजयकाराशिवाय समर्थांचं आयुष्य पूर्ण होऊच शकलं नाही तो रघुकुल शिरोमणी राम त्या रघुकुळामध्ये आऊसाहेब विवाह होऊन स्नुषा म्हणून दाखल झाल्या. मला हा फार अभूतपूर्व योग वाटतो की जी दोन नावं अशी आहेत की ज्यांच्या पुढे तमाम हिंदू आज एकविसाव्या शतकातही नतमस्तक आहेत ती म्हणजे प्रभू श्रीकृष्ण आणि प्रभू श्रीराम आणि यात दोनही कुळांचे समर्थ आणि औरसा वारसा सांगत छत्रपती शिवराय जन्माला आले.

हे भोसले मूळचे श्री राम वंशी सिसोदिया कुलोत्पन्न. प्रभू रामाचा थोरला मुलगा लव त्याच्यापासून चालेला हा वंश आणि हे यादव जाधव हे प्रभू श्रीकृष्णाच्या औरस वारस. रामकुळ आणि कृष्णकुळ एकत्र झाल्यानंतर काय घडू शकतं तर शिवभारत घडू शकते आणि हे शिवभारत आता घडवायची जबाबदारी तुमची आमची आहे. आपण विचाराने कृतीने रामकुळाचे आणि कृष्ण कुळाचे वारस होऊ शकतो. मघासून इथे आज अनेक उल्लेख झाले आहेत. सत्यनिष्ठ, धर्मनिष्ठ राज्य म्हणजे स्वराज्य. मला एक उल्लेख जरूर सांगायचा आहे. इथे डाव्या हाताला प्रसंग आहे शिवराज्याभिषेकाचा. हे राज्याभिषेकाचं ३५१वं शक चालू आहे आणि या विषयाची नांदी ठरलेला जो प्रसंग आहे तो आहे सिंदखेडच्या जाधवरावांच्या बखरीतला. कथाभागाची सहजता सुलभता म्हणून त्या कथानायिकेचं वय आपण सहा असं धरू या. कारण मी नंतर सांगते. जशी तुमच्या माझ्या घरातली सहा वर्षांची मुलगी सगळ्या मैत्रिणी जमवून भातुकलीचा खेळ मांडते तशी जाधवांची नवसासायासाने झालेली एकुलती एक लाडकी राजकन्या जिजा, तिच्या सगळ्या मैत्रिणींना जमवून भातुकलीचा खेळ मांडून बसली होती. जिजाला एक जन्मदात्री सख्खी आऊ आहे म्हाळसाऊ आणि तीन सावत्र आया आहेत आणि प्रत्येक आईचं या मुलीवर आत्यंतिक प्रेम आहे आणि काहीच वेळामध्ये जिजाऊ मुसमुसत आपल्या सगळ्या आऊंपाशी आली आणि जिजा सांगतीये माझा बाहुला ना राजा आहे. आम्ही बाहुला बाहुलीचं लगीन काढलं आहे आणि माझा बाहुला राजा आहे आणि माझ्या राजाला बसायला सोन्याचं सिंहासन हवं आहे आत्ताच्या आत्ता. सहा वर्षांची मुलगी आहे, हा शब्द तर आलाच पाहिजे, 'आत्ताच्या आत्ता' आणि प्रत्येक आऊ आपापल्या परीने समजूत काढते की जिजा सिंहासन कुठून मिळणार. सिंहासन नाही आत्ता. सोन्याचा चौरंग देतो. आजच्या भाषेचे सांगायचं तर 'ऑप्शन', विकल्प आणि आपला सनातन धर्म असं सांगतो की संकल्प करो, विकल्प मत करो!

फक्त संकल्प करा. संकल्पाच्या पूर्तीकरिताच आयुष्याचा प्रवास ठेवा. ही सहा वर्षांची मुलगी आहे. तिचा संकल्प तिचा दृढनिश्चय आहे. ती म्हणते चौरंग चालणार नाही. चौरंग हा ऑप्शन झाला. हा विकल्प झाला आणि तो मला मान्य नाही. कुठला राजा चौरंगावरती बसतो? चौरंग वगैरे चालणार नाही. दुसरी आई म्हणते की चल चौरंग नको? आपल्याकडे रत्नजडित असा प्रभू श्रीकृष्णाचा सोन्याचा झोपाळा आहे. तो देते. ती म्हणते, ''नाही नाही! राजा सिंहासनाधिष्ठितच असायला हवा. प्रत्येक आई समजूत काढतीये. तुकोबांनी लिहून ठेवलेलं आहे. 'शुद्ध बीजापोटी । फळे रसे रसाळ गोमटी।' त्यांच्या जन्मदात्री मातोश्री आहेत म्हाळसाऊसाहेब आणि त्या येऊन काय सांगताहेत? ''जिजा, पहिले तर रडे आवरा!'' मला आज म्हाळसाऊचं निमित्त करून इथे जमलेल्या संपूर्ण स्त्री वर्गाला सांगायचं आहे की रडणं हे कोणत्याही गोष्टीवरचं उत्तर असू शकत नाही. तर पहिले तर रडे आवरा आणि जे हवं आहे ते प्रयत्नपूर्वक मिळवा. मागून मिळालेली गोष्ट टिकत नाही. केवढी मोठी शिकवण आहे ही. मागून, लाचारीने जगू नका, स्वाभिमानाने जगा! म्हाळसाऊ पुढे सांगताहेत की जिजा सिंहासन मांडायचा आहे ना तर पाया हवा निष्ठेचा, त्यागाचा, स्वधर्म प्रेमाचा, स्वराष्ट्र प्रेमाचा!

आणि एखादी आई कशाला, तुम्ही मी पण ह्या अनुभवातून गेलेलो आहोत की आपल्याला असं वाटतं की खूप बडा चढाके सांगितलं आणि थोडा आवाज चढून विचारलं की 'हवंय का अजून?' तर मूल म्हणतं नकोच मग! पण ती जिजा आहे ना तिने डोळे पुसले आणि ती आईला सांगते आता तर सिंहासन हवंच पण ते आम्ही मागणार नाही ते आम्ही मिळवणार! तुम्ही म्हणता त्या प्रत्येक गोष्टीचा पाया आम्ही आमच्या स्वतःच्या कृतीतून घालणार! आणि हे इथे साकारलेले सर्व शिवप्रसंग, त्यांची गोळाबेरीज करा. महाराजांच्या आयुष्यातला एक एक युद्धप्रसंग म्हणजे त्यांचा पुनर्जन्म आहे आणि त्या पुनर्जन्माच्या प्रत्येक वेळच्या प्रसंगाच्या प्रसूती वेदना सहन करिताहेत राजमाता जिजाऊसाहेब. कारण हे धाडस कुठलाही पुरुषवर्ग करू शकत नाही. ही वस्तुस्थिती आहे. एका मुलाला जन्म देणं म्हणजे त्या स्त्रीचा पुनर्जन्म असतो पण इथे आऊसाहेबांना रडण्याची, विव्हळण्याची, आरडाओरड करण्याची मुभा नाहीये कारण अखखं स्वराज्य त्यांच्या स्वाधीन आहे. या प्रसंगाकडे मी येणार आहे पण त्याच्या आधी मला सांगायचा आहे अफजलखानाचा प्रसंग. कारण त्या एकेका प्रसंगातलं गांभीर्य कळलं ना की मग या शिवराज्याभिषेक या प्रसंगाचं महत्त्व ठळक होत जातं.

अफजलखानाचा प्रसंग घ्या. एक पत्र आहे आणि ते विजापूर



*“जिजाबाई या चार अक्षरांमध्ये आदर्श जगण्याचा वस्तू पाठ त्यांनी घालून दिलेला आहे. जि म्हणजे जिद्द, जा म्हणजे जाणतेपणा, बा म्हणजे बाणेदारपणा, स्वाभिमान आणि ई म्हणजे ईश्वरावरची निष्ठा.” सौ. सायली गोडबोले –जोशी*

***सौ. सायली गोडबोले जोशी– परिचय***

*शिक्षण – बी. ए. (मराठी), एम्. ए. (इतिहास), संस्कृत कोविद, मराठी साहित्य विषारद*

*साहित्य – दर्यापार (काव्यसंग्रह), जिजाऊ – शोध आणि बोध (६०० पानी चरित्रग्रंथ, दुसरी आवृत्ती प्रकाशित)*

*आगामी – ऐतिहासिक ग्रंथ पेशवा, राजराजेंद्र, हैबती*

*व्यावसायिक सूत्रसंचालक, १५००हून अधिक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन; एकपात्री नाट्यप्रयोग – जिजाऊ (५५० प्रयोग), सखीराज्ञी महाराणी येसुबाई, काशीबाई पेशवे, अग्निशीखा– मर्दानी झांसीवाली, महानंदा, माई सावरकर; ‘पंचकन्या’ या साडेसात तासाच्या एकपात्री प्रयोगाची लिम्का बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद. ‘चैतन्य ब्रह्म माझे’ या ध्वनी–चित्रफितीत मुख्य भूमिका, पुण्यश्लोक अहिल्याबाई, रमा–माधव – एका अद्वैताची कहाणी या नाटकांची संकल्पना, संहिता, दिग्दर्शन आणि प्रमूख भूमिका*

*५५०पेक्षा जास्त व्याख्याने, निरुपणे इत्यादी. सुहासिनी मुळगांवकर एकपात्री अभिनयासाठीच्या करंडकासह सुमारे ६० विविध पुरस्कार.*

रेकॉर्ड्समध्ये उपलब्ध आहे. दुर्दैवाने मराठ्यांच्या इतिहासातून ते पत्र का गहाळ झालं हे मला माहीत नाही. रायगडचा दफ्तरखाना जाळला त्या वेळी ते नष्ट झालेलं असावं. प्रसंग लक्षात घ्या. खानाचा मुक्काम आहे वाईच्या प्रांती. महाराज आहेत प्रतापगडावरती. आऊसाहेब महाराजांचा सगळा राजकबिला बरोबर घेऊन राजगडावरती राहिलेल्या आहेत. नुकतंच सईबाईंचं निधन झालेलं आहे. त्यांचे उत्तर कार्य होऊन जेमतेम दहा–बारा दिवस होत आहेत आणि एकाच वेळेला स्वराज्य महाराणीशिवाय पोरकं झालेलं आहे. कौटुंबिक परिस्थितीबद्दल बोलायचं तर सईबाईंपासून झालेल्या तीन मुली आणि अडीच वर्षांचे शंभू बाळ यांनी जन्मजात्या आईला गमावलेलं आहे. आऊसाहेबांना एकूण संतती सहा. त्याच्यातली जगलेली मुलं केवळ दोन. थोरले संभाजी आणि धाकटे शिवाजी. त्यातल्या थोरल्या संभाजीला याच अफजलखानाने अत्यंत कुटनीती वापरून शत्रूच्या तोफेचा गोळा लागला असं सांगून मारलं. एक प्रकारे हा खूनच होता आणि अशा बिकट परिस्थितीमध्ये तुमच्यामाझ्यासारखी आई असती ना तर तिने धीर सोडला असता. तिने रडून आकांत मांडला असता की शिवबा तू गडावरती परत ये. तुझ्या जागेवर दुसरा कोणी भेटायला जाऊ दे. ते चालेल. इथे जिजाऊंसारखी सक्षम आई महाराजांना कळवतायेत की ‘खानास पुरून उरणे!’ आणि महाराज किती मातृभक्त असावेत ना. खानाला ‘पुरलं’ आणि स्वतः उरले!! पण या सगळ्या प्रसंगात आऊसाहेबांनी अफजलखानाला लिहिलेले एक पत्र आहे आणि त्या पत्राचा मायना मजकूर वगैरे मोठा भाग आहे. मुख्य मुद्द्याची गोष्ट सांगते की आऊसाहेब खानाला असं कळवताहेत, मूळ पत्र फारसीमध्ये आहे.

आऊसाहेब द्वादश भाषा कोविद आहेत. म्हणजे बारा भाषांवरती त्यांचे प्रभुत्व आहे. फारसीमध्ये अफजलखानाला पत्र लिहिताहेत आणि सांगताहेत, ‘प्रथम तर प्रतापगडी लक्ष देणे. स्वराज्य आमच्या पदराखाली सुखरूप असे. प्रतापगडी शिवबा किंवा अन्य कोणाच्या केसालाही धक्का लावशील तर फुटलेली भवानी तुला आमच्यात दिसेल.’ काय त्या शब्दामागची धग आहे लक्षात घ्या!

आणि तो अफजलखान ज्याला बडा सरदार असं म्हंटल जायचं आणि जेव्हा त्याला कळलं की पत्र आलंय आणि पत्र कोणाचं आहे तर शहाजीच्या बेगमचं आहे. कारण शहाजी त्यांचे सहकारी आहेत विजापूर दरबारातले. तो त्याच्या सहकाऱ्यांना सांगतोय, ‘अब तो वो गिडगिडायेगी और हमसे उस बच्चे की जान बक्ष देगी।’ आपल्याकडे त्या मुलाचं प्राण दान मागेल! इथे ही आई त्यालाच धमकावतीये की बरं समजुन असणे की एक शिवबा संपला म्हणजे स्वराज्य संपेल असं जर तुला वाटत असेल तर असं होणार नाही. केवढी मोठी गोष्ट आहे ही. अशाच प्रकारचा एक पुढचा प्रसंग तो म्हणजे मिर्झाराजे जयसिंग ज्या वेळेला दख्खनमध्ये होते आणि महाराज दिल्ली आग्राच्या मोहिमेवरती होते. याची ही दोन पत्रं उपलब्ध आहेत. एक मुघल रेकॉर्डमध्ये आहे आणि दुसरं रजपुत रेकॉर्डमध्ये आहे. हे पत्र मिर्झाराजांनी औरंगजेबाला पाठवलेलं आहे आणि त्याची एक कॉपी त्यांनी आपला तिथला मुलगा होता रामसिंह त्याला पाठवलेली आहे. मजकूर मायना वगैरे सोडून देऊ. मुख्य मुद्द्याकडे येऊ. तर प्रसंग लक्षात घ्या. महाराजांनी तह केला

आहे. २३ किल्ले महाराजांनी मुघलांना दिलेले आहेत. बारा किल्ले आणि स्वराज्य आऊसाहेब सांभाळत आहेत आणि आता स्वराज्य संपलंच असा विचार करून मुघल सेनेने मोर्चा वळवला आहे तो विजापुराकडे. स्वराज्याची हद्द आता बऱ्यापैकी सुरक्षित झालेली आहे. चार महिन्यांची कैद आहे. महाराज मार्चमध्ये आग्र्याला पोहोचले. मार्चमध्ये भेट झाली. बारा मार्चला औरंगजेब आणि शिवबा यांची भेट झाली. त्या दिवसापासून महाराज नजरकैदेमध्ये आहेत. महाराज अठरा ऑगस्टला तिथून निसटले. आणि त्याच्या आधी दोन दिवस सोळा ऑगस्टला आऊसाहेबांनी जातीनिशी जाऊन कर्नाटक प्रांती असलेला रांगणा नावाचा किल्ला जिंकून घेतलेला आहे आणि ही गोष्ट ज्या वेळेला मिर्झाराजेंना कळली त्या वेळेला मिर्झाराजे याचा रिपोर्ट देताहेत बादशहाला आणि ते असं लिहिताहेत की बादशहा सलामत को अगर डर शिवाजी से है तो वह उनकी ही कैद में हैं । शिवाजी को मार दो, डर खतम हो जाएगा। लेकिन अगर खौफ स्वराज का है, तो वह खौंफ अभी भी जिंदा है। जब तक उसकी बुढी मां राजगड पे जिंदा है यहां घरघर शिवाजी पैदा होगा। यहा घर घर शिवाजी पैदा होगा और ये मरहट्टों का मुलुख उनका स्वराज पाकर ही रहेगा।' शत्रूला आमच्या आऊसाहेब कळल्या! ज्या आईने हा महाराष्ट्र घडवला, आज तुम्ही आम्ही हिंदू म्हणून जगतोय एकविसाव्या शतकामध्ये, ती त्या आईची देणगी आहे. भूषण लिहितात की 'हिंदूओंकी चोटी राखी। सिपहन की रोटी राखी। आज खांद्यावरचं जानवं, डोक्यावरची शेंडी आणि क्षत्रियाच्या हातातली तलवार टिकली आहे त्याचं कारण आहे शिवाजी. तर मूळ शिवाजीला जन्माला घालणारी त्या सगळ्याचं मूळ कारण आहे राजमाता जिजाबाई. विचार करा की काय बिकट परिस्थिती आहे. पारतंत्र्याची रात्र आहे. घोर रात्र आहे. आपल्याकडे सूर्योदयापूर्वी उषःकाल ही जी गोष्ट आहे ना त्याला परमपवित्र म्हटलं गेलेलं आहे. तर या स्वातंत्र्याचा उषःकाल म्हणजे जिजाबाई आऊसाहेब आहेत आणि त्यांच्या बरोबरीने योगदान आहे शहाजी महाराजांचं! नाहीतर काय होईल ? (पुरुष श्रोत्यांकडे निर्देश करून) इकडच्या वर्गाला वाटेल, बरं आहे! जे काही सगळं करायचं आहे ते सगळं इकडच्या बायकांनी पूर्ण करावं. आम्ही आपले टाळ्या वाजवायला रिकामे! तर असं नाही. लखोजीराव, शहाजीराजे जेव्हा इकडच्या गटातून निर्माण होतील तेव्हा (महिला श्रोत्यांकडे निर्देश करून) या बाजूनेही जिजाऊ निर्माण होईल आणि मग हा आक्रोश करावा लागणार नाही की महाराज पुन्हा जन्माला या. बाय डिफॉल्ट, महाराजच जन्माला येतील. जेव्हा दोन स्वातंत्र्यप्रेमी मनं एकत्र येतात. मला अगदी हे उदाहरण कायम तात्याराव आणि माई यांचं वाटतं.

शहाजीराजे आणि जिजाबाई काय बोलले असतील याविषयी इतिहास मूक आहे. एक कानडी बखर फक्त मिळते महाराज शहाजीराजे नावाची आणि त्याच्यामध्ये युगद्रष्टे भोसले कुलावतंस महाराज शहाजीराजे, सहा वर्षांच्या शिवबांना घेऊन जिजाऊ जेव्हा पुनवडीत निघाल्या ना तेव्हा त्यांना सांगत होते की राणीसाहेब तुम्ही मावळप्रांती स्वराज्य निर्माण करा. आम्ही संभाजीला घेऊन कर्नाटक प्रांती स्वराज्य निर्माण करू. पुढामागुता काळवेळ बघून दोन्ही स्वराज्य एक करू. संभाजी थोरले सबब ते सिंहासनाधिष्ठित राजे होतील आणि धाकटे शिवाजी आणि कनिष्ठ व्यंकोजी त्यांचे हस्तक बनून आसिंधूसिंधूपर्यंत एक छत्र एक राज्य एक भगवा निर्माण करतील.

मघाशी जेव्हा आम्ही ध्वज पूजन केलं माझ्या अंगावरती अक्षरशः शहारे उमटलेले होते कारण हे शहाजीमहाराजांचं स्वप्न होतं. सिंधू नदीच्या उगमापासून सिंधू समुद्रापर्यंत एक छत्र, एक राज्य, एकच भगवा असला पाहिजे. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जिजाबाई सहा वर्षांच्या मुलाला घेऊन स्मशान झालेल्या पुनवडीत राहायला आल्या. सोपी गोष्ट नव्हती. आज आपण अगदी विज्ञानवादी आधुनिक पुरोगामी महाराष्ट्रामध्ये राहतोय. आत्ता तुम्हाला सांगते स्मशानामध्ये फुकट प्लॉट देते. बंगला बांधा आणि रहा. सगळ्या गोष्टी पुरवते. नाही तयार होणार कोणी वस्तुस्थिती आहे. अख्ख स्मशान झालेल्या पुनवडीमध्ये सहा वर्षांच्या मुलाला घेऊन राहायचंय. इन्स्टा नाही ट्विटर नाही मोबाईलच नाही मुळातच. त्यामुळे रोजचे व्हिडिओ कॉल्स वगैरे याचा दुरून दुरून काही संबंध नाही. एक खलिता इथून कर्नाटकात पाठवायचा तर खलिता पोहोचायलाच आठ दिवस आणि उलट टपाली त्याचे उत्तर यायला आठ दिवस. असा विचार केला तर पंधरवडा तर असाच जायचा. माहेरचा आधार तर उरलेला नाही. सगळं माहेर निजामाच्या दरबारात कापलं गेलेलं आहे. सासरचा आधार नाही कारण पती शहाजीराजे दूर कर्नाटकात आहे. अशा वेळेला समर्थ रामदास स्वामींनी आदिशक्तीला जी विनवणी केलेले आहे ना, 'तुझा तू वाढवी राजा' ही प्रेरणा आऊसाहेबांनी घेतली आणि मातृमुखी स्वराज्य निर्माण केले. ही गोष्ट खरोखर सोपी नाही.

इथे त्यांनी काय काय नाही केलं? तर मघाशी सांगितलं गेलं की शेतकऱ्यांसाठी कामं केली जातात. याची सुरुवात पुन्हा एकदा आऊसाहेबांनी केलेली आहे. सारा घ्यायचा. कसा घ्यायचा सारा. टॅक्स गोळा कसा करायचा. आज आपल्याला सातबारा हा शब्द अगदी इतका काही जिवापाड महत्त्वाचा झालाय ना की सातबारात नाव सापडलं ना की लोकांना परमानंद होतो. तर ही सातबारा सिस्टीम आली कुठून, आऊसाहेबांनी आणली ही सिस्टीम. सोळाव्या शतकापर्यंत सातबारा नावाचं प्रकरण काहीही अस्तित्वातच नव्हतं. मग सातबारा हा कागद होता का? तर सातबारा

हा कागद नव्हता. सातबाराचा हा उतारा नव्हता तर काय होतं. झाड लावलेली होती ना त्यातली बारा झाडं ही त्या माणसाची, ज्याची जमीन असेल त्याची आणि सात झाडं ही राज्याची. त्यांनी संगोपन सगळ्या झाडांचं करायचं. सात झाडाचं उत्पन्न त्याने राज्य खंडणीत टॅक्स म्हणून द्यायचं आणि बारा झाडांचे उत्पन्न त्याने स्वतः वापरायचं केवढी मोठी दूरदृष्टी आहे ही. आमच्याकडे पैसे नाही म्हणून आम्ही रडतो पण पैसे असे निर्माण करिता येऊ शकतात. इथे मला जिजाऊ साहेबांची इकॉनॉमिकल मॅनेजमेंट दिसते. आम्ही काल प्रेझेंटेशन ऐकत होतो. बघत होतो. काल आम्ही शाळापण बघून आलो. आंत्रप्रेनियरशिप हा आजच्या युगाचा मंत्र आहे ना. तर एक स्वराज्य उद्योग निर्माण करणारा पहिला उद्योजक हा या राष्ट्रमातेने घडवला आणि काय सूत्री वापरली आहे. स्वदेशी, स्वद्धर्मप्रियता आणि स्वराष्ट्रनिष्ठा या त्रीसूत्रीवरती हा स्वराज्याचा उद्योग आधारलेला आहे. हा सगळा पाया आहे. हे सगळं फाउंडेशन आहे. कशाचं, त्या सहा वर्षांच्या मुलीने जे स्वप्न पाहिलं होतं ना माझं सिंहासन मी मिळवीन या गोष्टीचं.

आज तुमच्या माझ्यासाठी अगदी जिवलग म्हणविणाऱ्या माणसांकडून, नवीननवीन प्रेमात पडलेली लोकं असतात की नाही ते म्हणतात मी तुझ्यासाठी चंद्र आणीन आणि तारे आणीन, खूप लांबची गोष्ट आहे! तेवढे नको, एक करंगळीचा टवका कापून दिला तरी पुरेसा आहे. देईल कोणी? आपणसुद्धा नाही देणार. कुठून हा बाजीप्रभू आणि तानाजी वगैरे जन्माला आले? कोण कुठले महाराज! त्यांच्या रक्ताचे नाहीत, काही नाही! पण त्यांना एका समान सूत्राने जोडलेलं होतं की देव, देश आणि धर्मासाठी आपल्याला जगायचं आहे. तानाजी सिंहगडावरती जगायला गेले होते. तानाजी सिंहगडावरती आजही जगताहेत, ते देश देव आणि धर्माच प्रतीक होऊन. समर्थ रामदास स्वामींनी उपदेश केला होता की 'मुलूख बडवावा की बुडवावा धर्मसंस्थापनेसाठी।' आणि महाराज आणि आऊसाहेब कायम सांगतात की हे श्रींचं हिंदवी स्वराज्य आहे. जिथे परमेश्वराचं अधिष्ठान आहे तीच गोष्ट शाश्वत राहू शकते. पुढे धर्मवीर म्हणून ज्यांना आपण गौरविलं त्यांच्यासमोर का कमी प्रलोभनं ठेवली का औरंगजेबानी? औरंगजेबासारखा कट्टर माणूस शेवटी संभाजीला असं सांगतो की बाबा रे मुस्लिम धर्माचा स्वीकार कर. माझ्या मुलीशी लग्न लावून देतो. याच्यापेक्षा मराठेशाहीचा विजय काय असायला हवा? आणि तरीही आमचा छत्रपती नमत नाही. आपण ते प्रसंग वाचून हळहळतो. खरंच अवघड आहे सगळं! ती काकडीसारखीच सगळी कातडी सोलून काढायची. त्याच्यावरती तिखटा मिठाचं पाणी ओतायचं. खालून मिरचीची धुरी द्यायची. सफर ए आखिरत. शेवटाकडे जाणारा प्रवास अशी जी औरंगजेबाची डायरी आहे त्याच्यामध्ये हा औरंगजेब लिहितो. दोन मोठ्या गोष्टी या औरंगजेबानी नमूद केल्यात. एकतर सत्तावीस वर्ष मी गाढवपणा केला की दिल्लीचं तख्त सोडलं आणि या महाराष्ट्र भूमीमध्ये वणवण भटकतो आहे आणि एवढं करून हाताशी मातीची ढेकळे सोडल्यास आणखीन काहीच लागलं नाही आणि दुसरी गोष्ट काय शिकलो तर शिवाजी नावाचा प्रबळ शत्रू, त्याच्याहून शूर त्याचा मुलगा संभाजी, आणि या दोघांवरती संस्कार करणारी त्याची आई! मी मूळच्या औरंगजेबाच्या शब्दांमध्ये त्यांनी आऊसाहेबांचे महात्म्य कसं सांगितलं ते सांगते. औरंगजेब असं म्हणतो की तो जो शिवाजी आहे आणि तो जो संभाजी आहे त्यांच्या मनामध्ये संस्कारांचं बीज कोणी रोवलेलं आहे तर ती आहे राजमाता जिजाबाई. वह है उसकी मां जिसने सिवा के मन की रचना ही कुछ ऐसी की उसे हर इंसान में छुपा खुदा ही नजर आ जाये. त्या माणसाला प्रत्येकामध्ये लपलेला ईश्वरच दिसतो. ही आमच्या हिंदू धर्माची ताकद आहे. मग माउलींनी जे स्वप्न इथे मागितलं ना विश्वात्मक देवाकडे की विश्व स्वद्धर्म सूर्ये पाहो. या विश्वाला स्वधर्माचा सूर्य दिसू देत. एका सूर्यकुळातल्या सूर्यपुत्राने हे स्वप्न सिंहासनाधिष्ठित केलं. या विश्वाला पारतंत्र्याच्या घोररात्रीनंतर स्वधर्मसूर्य मिळाला तो म्हणजे शिवराज्याभिषेक आणि हे सगळं होईपर्यंत आऊसाहेबांचं वय झालेलं होतं ७६ वर्षांचं. म्हणजे कमीत कमी ७० वर्ष ती मुलगी हा एक ध्यास घेऊन जगत होती की माझं सिंहासन मी मिळवीन. मागणार नाही. मी कायम म्हणते की मराठी माणसाला डिप्रेशनमध्ये जाण्याचा अधिकारच नाही. काही हक्कच नाही हो आपल्याला. असे काही आपल्यावरती जीवावरचे प्रसंग ओढावलेले नाहीत. एकुलता एक हयात मुलगा आहे शिवाजी. तो मागे जो प्रसंग आहे ना शाहिस्तेखानाचा. विचार करा दीड लाख फौजेचा गराडा बसलेला आहे. महाराज चारशे मावळे घेऊन पुनवडीमध्ये आलेत आणि त्यातले फक्त पावणेदोनशे मावळे घेऊन महाराज लाल महालामध्ये शिरले. चुकून जरी दैवाचं दान उलट पडलं असतं ना तरी महाराजांचं नखसुद्धा परत फिरून दिसलं नसतं आणि अशा प्रसंगी ही आई मुलाला काय प्रेरणा देते की राजे बळानं बुद्धीचा पराभव करिता येत नसतो. युक्तीने कार्य करा. यश देणार श्रीसांब आणि अंबा समर्थ आहे. मला कायम असं वाटतं की जिजाबाई या चार अक्षरांमध्ये आदर्श जगण्याचा वस्तू पाठ त्यांनी घालून दिलेला आहे. जि म्हणजे जिद्द, जा म्हणजे जाणतेपणा, बा म्हणजे बाणेदारपणा, स्वाभिमान आणि ई म्हणजे ईश्वरावरची निष्ठा. आपल्याकडे मराठीत एक म्हण आहे, 'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी!' अजिबात देणार नाही. अजिबात देणार नाही कारण आमच्या धर्माला हा आळस मान्यच नाही, मान्यच नाही. आपल्याकडे बाळ नचिकेतालासुद्धा असं सांगितलं की 'उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत।' ऊठ, जागा हो. आळशीपणाने झोपून राहून स्वप्नात तुला दृष्टांत आणि साक्षात्कार वगैरे आम्ही

देणार नाही. तुला दृष्टांत हवा असेल, साक्षात्कार हवा असेल तर तू कर्मप्रवण हो. तू कर्म कर आणि आऊसाहेबांनी कायम हेच केलंय. आऊसाहेबांनी कायम कर्तव्याच्या रथावरती शिवबाला आरुढ करून पाठवले आणि त्याच्यानंतर त्या देवाची करुणा भाकताहेत! अफजलखानाच्याच प्रसंगाचे उदाहरण घेते मी. कारण सभासदांनी नमूद केले आऊसाहेब राजगडावरती आहेत. महाराज प्रतापगडावरती आहेत. आत्ताच सांगितलं की नुकताच काय काय प्रसंग गुजरलेला होता. आणि अशा प्रचंड दुःखात, तणावात, संकटाच्या काळात आऊसाहेबांना त्यांचं लहानपण मिरवायला एकच जागा होती आणि ती म्हणजे जगदंबा. आऊसाहेब तिच्यापुढे उभ्या आहेत आणि मागण्यासाठी उभ्या नाहीत. लाचारी कुठेच दिसत नाही. त्या शब्दाशब्दातून झळकतो ना तो आहे स्वाभिमान आणि निष्ठा. त्या जगदंबेलाच सांगताहेत की हे आई भवानी, इथून पुढचे अवतार घ्यायचे कष्ट नको असतील तर आज माझ्या शिवबाला मदत कर म्हणजे तुझेच कष्ट कमी व्हावेत म्हणून सांगते. मला काही प्रॉब्लेम नाही. पण तुलाच परतपरत अवतार घ्यायला लागू नयेत म्हणून सांगते. आपल्यासारख्या आयांना नाही हो जमायचं. खरंच नाही जमायचं. ऑलरेडी पाच मुलं गमावली आहेत. एक सहावा उरलेला तोही तासाभराने जगतोय का राहतोय अशी स्थिती आहे आणि अशा परिस्थितीमध्ये आऊसाहेब जगदंबेला सांगताहेत की हे भवानी सहा मुलांची आई असलेल्या आम्ही निपुत्रिक म्हणून तुझ्या दारी यावं यापेक्षा करंटं हे ठरेल की तुझं पूर्ण करायला घेतलेलं स्वप्न अर्धवट टाकून आम्ही तुझ्या दारी येणं. हे श्रींचं स्वराज्य व्हावं जगदंबे हे तुझं स्वप्न आहे. तुझ्यावतीने आम्ही ते करायला घेतलं आहे. मुल जाईल याचं मला फारसं दुःख नाही. पण स्वप्न अर्धवट टाकून तुझ्या दरबारात यावं लागेल तर ते मला आवडणार नाही. अशी विनवणी केल्यानंतर देवच संकटाच पडत नसेल तरच नवलच आहे.

दादा(कानिटकर) तुम्ही म्हणलात ना सावरकर आणि महाराज यांच्यातला अजून फरक जाणवतो आणि याचा प्रसंग मी पुन्हा सांगते. सिंदखेडचे जाधवरावांच्या बखरीत आहे. जिजाऊंचा जन्म होतानाच त्यांच्या राजज्योतिषांनी हे भाकीत वर्तवले की पुढामागूता हिच्या पोटी साक्षात कैलासपती शिव अवतार घेईल. छत्रचामरांकित राजा होईल आणि आईच्या आशीर्वादे दिगंत कीर्तीचा होईल. सावरकरांच्या डोक्यावरती मातृछत्र नव्हतं. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या डोक्यावरती मातृछत्र नव्हतं आणि त्यांचा शेवट हा फार भीषण झाला आणि महाराजांच्या डोक्यावरती महाराजांनी फक्त सहाच वर्ष आयुष्यातली मातृछत्राविना काढलेली आहेत. तोपर्यंत अखंडपणे छत्रपतींवरती ज्यांचं छत्र आहे अशा आहेत राजमाता जिजाबाई आऊसाहेब. मला अजून एका गोष्टीकडे अवधान वळवायचे ते म्हणजे समर्थांनी ज्यांना श्रीमंत योगी असं म्हणलेलं आहे या विषयाकडे. बत्तीस मण सोन्याचा सिंहासन केलं अशा अर्थाने श्रीमंती नाही म्हटलेली आणि अशा अर्थाने मराठेशाही फार कधी श्रीमंत नव्हती आणि रामदास स्वामींनी अशा अर्थाने महाराजांना श्रीमंत असं म्हटलेलंच नाही. मतीमध्ये ज्याच्या ‘श्री’चा वास आहे अशा अर्थांनी श्रीमंत आणि योगी. ‘यज’ या शब्दाचा मूळ धातूचा अर्थ होतो जोडले जाणे, टु कनेक्ट समव्हेअर. आणि महाराज अशा ठिकाणी जोडले गेलेले आहेत ती आहे राष्ट्रनिष्ठा. प्रत्येक वेळेला देश प्रथम, राष्ट्र प्रथम हे महाराजांचं सूत्र ठरलेलं आहे आणि प्रत्येक युद्धामध्ये महाराजांनी स्वतः त्या मोहिमांमध्ये भाग घेतलेला आहे. महाराज इथे बसून त्यांनी आदेश नव्हते सोडलेले की जा आणि सुरत लुटून या. सुरत लुटून आणली की त्या पैशांचं पुढे काय करायचं त्याची मॅनेजमेंट बघायला मी इथे आहे. पुढे तिथे प्रसंग आहेत. सुरतेचा तो सुभेदार इनायत खानाने पाठवलेला एक हेर महाराजांवरती चालून आलाय. आमच्या इतिहासाचं दुर्दैव आहे की महाराजांच्या त्या अंगरक्षकांची नावे आपल्याला ठाऊक नाहीत पण किती सतर्क आणि सावधान असावेत लोक! आणि पुन्हा एकदा सांगते, समर्थ संप्रदायाच्या दासायन ग्रंथामध्ये उल्लेख आढळतात की अनेक अंगरक्षक हे समर्थांनी घडवून तयार केले आहेत. सोनार जसे अलंकार घडवतो ना तसे कोरे मावळे, कोरी लोकं, लहान मुलं हाताशी धरून समर्थांनी उद्याचे मावळे घडवले. ठाकून ठोकून तयार केले. घण कशाचे घातले. राष्ट्रनिष्ठेचे, स्वधर्मनिष्ठेचे, स्वराज्य प्रेमाचे आणि असे मावळे महाराज अंगरक्षक म्हणून बरोबर घेऊन सुरतेपर्यंत गेले. हा सुभेदाराकडून आलेला माणूस महाराजांना म्हणतो की तुमच्याशी एकांतात बोलायचंय. सगळे जण चार चार पावलं मागे गेलेत पण नेम किती अचूक असेल बघा. चार पावलावरनं मारलेल्या तलवारींनी त्या माणसाची क्षणार्धात खांडोळी केलेली आहे. तरी ही जी अचूकता आहे. ही जी ध्येयाप्रती असलेली निष्ठा आहे ही मिळते ती अध्यात्माच्या आकलनातून आणि महाराज अध्यात्मपंथी होते आणि त्याचा सगळ्यात मोठा पुरावा नुकतंच मी काही कागदपत्र वाचत होते आणि त्याच्यामध्ये आळंदीच्या माउलींच्या समाधीला स्वतः महाराज शहाजीराजे, आऊसाहेब आणि छत्रपती शिवराय यांनी काही वर्षांसनं लावून दिलेले कागदपत्र सापडले. चाफळला तर महाराजांनी वर्षासन लावून दिलेलं होतंच आणि आऊसाहेबांचा हा कटाक्ष होता की ह्या राज्यातला प्रत्येक साधू संत हा पूजनीय वंदनीय असायला हवा. मग सिंधुदुर्गाचे बांधकाम करणारे विनायक भट आणि जानभट अभ्यंकर असतील, सुरुवातीला घाबरत होते की तुम्ही आज याल, किल्ला बांधाल निघून जाल. पुढे हापसी आणि आम्ही आमची तोंडावर तोंड पडायची आहेत. महाराजांनी सांगितलं की असं होणार नाही. तुमच्या केसालाही धक्का लागू

देणार नाही. बरेचदा असं होतं की महाराजांची संपूर्ण बिरुदावली गाताना पहिले दोन शब्द चटकन बोलून विस्मरणात पडतात. गोब्राह्मण प्रतिपालक या शब्दांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. गाय ही फक्त पूजनीय आहे म्हणून नाही तर गाय हा इतका मुका पशू आहे की तो स्वतःला झालेल्या त्रासाची कुणाकडे तक्रारही करायला येत नाही आणि तसाच समाजातला ब्रह्मवृंद जो स्वतः वरती होणारे अन्याय अत्याचार सहन करतो; पण त्याच्यासाठी कुठल्या ब्राह्मणांनी एकत्र येऊन उपोषणं, आंदोलनं केलीत असं कधीच झालेलं दिसत नाही. गांधीवधानंतर अनेक ब्राह्मणांची घरं पेटवली गेली पण त्याच्याबद्दल कधी ब्राह्मणांनी जाहीर आंदोलनं वगैरे केली असली चित्रं समाजामध्ये दिसली नाहीत. तर समाजाला नैतिकतेचं वळण लावून त्यांना राष्ट्रनिष्ठेच्या पायावरती उभा करणारा समाज घडवण्यासाठी जो ब्रह्मवृंद कारणीभूत ठरतो त्यांना अभय देणारा हा आमचा छत्रपती आहे आणि साष्टांग मूर्ती घडवणाऱ्या त्या म्हणजे राजमाता जिजाबाई आऊसाहेब. मी शेवटाकडे येताना कवयित्री योगिनी जोगळेकर यांच्या एका कवितेने शेवट करीन. त्या असं म्हणतात की

‘सूर्या आधी नमस्कार पूर्व दिशेला असावा । शिवाआधी दंडवत जिजामातेसी घालावा । राजे शहाजींची कांता माता म्हणून नांदते । अशी माय वर्णु जाता धाप शब्दांची लागते । हिच्या पुण्याईचे छत्र बाळ छत्रपती व्हावा । अशी माय वर्णु जाता शब्द सानूला पडावा ।’ तर मला माझ्या शब्दांचं सानपण पूर्ण ठाऊक आहे. घड्याळी वीस पंचवीस मिनिटांच्या वेळामध्ये ७६ वर्षांचा कालपटसुद्धा मांडून होणे शक्य नाही. कर्तृत्वाचा पट मांडणं ही माझ्या आवाक्यापलीकडची गोष्ट आहे. तरी जेवढी शब्दसेवा मला आज रुजू करिता आली ती मी केली. मी शेवटी एवढंच म्हणेन की ‘साक्षात जिजाऊंसारखे स्त्रीरत्न श्रींनी पैदा केले होते.’ ही जी बखरकारांची ओळ आहे ती सर्वार्थाने सार्थ आहे; तर इकडच्या भागातून पुढच्या समर्थ जिजाऊ घडाव्यात, इकडच्या भागातनं समर्थ शहाजी घडावेत म्हणजे मग शिवजयंती वेगळी साजरी करण्याची वेळच येणार नाही. घराघरात शिवाजी निर्माण होतील आणि आपलं हे राष्ट्र हे स्वधर्म प्रेरित राष्ट्र होईल. धन्यवाद !’’

शेवटी सभेचे अध्यक्ष श्री. रमेशराव पतंगे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, ‘‘.... सायली गोडबोले आणि सचिन कानिटकर यांची भाषणं ऐकल्यानंतर पुढे भाषण करण्याची काही गरज आहे असं मला काही वाटत नाही. पद्मश्रीचं बिरुद चिकटल्यानंतर मग अनेक ठिकाणी एक सामाजिक दायित्व म्हणून जावं लागतं आणि लोक समजतात की पद्मश्री मिळालेली आहे म्हणजे हा सर्वज्ञ माणूस आहे. असं काही नसतं. मी काही इतिहासाचा अभ्यासक नव्हे. मी ज्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघात वाढलो, लहानाचा मोठा झालो त्या संघामध्ये सहा उत्सव साजरे केले जातात. त्यातला एक उत्सव आहे शिवराज्याभिषेक दिनाचा. ज्येष्ठ शुक्ल त्रयोदशी, त्यामुळे ती तारीख पाठ झालेली आहे. दरवर्षी उत्सव आपल्याला करायचा आहे. आणि मग माझं संघआयुष्य वयाच्या सातव्या वर्षांपासून सुरू झालं. संघ जबाबदारीचं आयुष्य पंधराव्या वर्षांपासून सुरू झालं ते आजतागायत चालू आहे आणि त्यामध्ये मग प्रारंभी बाल शाखांचं काम असतं. मग बालांसमोर शिवाजी मांडायचे. आता जे सगळे प्रसंग आपण ऐकले; अफजलखानाचा कोथळा कसा काढला शिवाजीने, शाहीस्तेखानाची बोटं कशी तोडली, आग्र्यातून पलायन कसं केलं, बाजीप्रभूंनी खिंड कशी लढवली हे सगळे प्रसंग लहान वयात ऐकण्यामध्ये, सांगण्यामध्येसुद्धा खूप स्फूर्ती येते आणि ऐकताना तर रोमांच उभे राहतात आणि आपल्यापैकी ज्यांनी बाबासाहेब पुरंदरे यांच्या शिवचरित्राची व्याख्यानं ऐकली असतील. ते भाग्य मला लाभलं. त्यामुळे अफजलखानाच्या वधाचा प्रसंग ते असा काही उभा करत असत की ऐकणाऱ्याला असं वाटावं की हे पत्रकार म्हणून तिथे गेलेले आहेत की काय? अगदी बारीक तपशील ते सांगायचे. महाराज कसे गडावरून पळाले. कोणती वस्त्र घातली, काय होतं, तो सय्यद कुठे उभा होता, तो अफजलखान कुठे होता वगैरे वगैरे सर्व. तर हे सगळे प्रसंग, छत्रपती शिवाजीमहाराजांचं जीवन, हे महाराष्ट्रातील घरोघरी सर्वांना माहिती आहे आणि म्हणून शेवटी बोलणाऱ्या वक्त्यासमोर प्रश्न असा राहतो की प्रसंग जे तुम्ही ऐकलेले आहेत, तुम्हाला माहीत आहेत, ते पुन्हा पुन्हा सांगायचं काही प्रयोजन राहत नाही. आणखीन एक गोष्टीसाठी छत्रपती शिवाजीमहाराजांसंबंधी काही बोलणं हे आजची महाराष्ट्राची परिस्थिती पाहता आणि माझ्यासारख्या संघातल्या माणसाला हे थोडंसं काय असतं त्याला, ‘रिस्की’ म्हणता येईल अशा प्रकारचा विषय असतो. काय असतं की ते राहुल सोलापूरकर कधीतरी बोलले महिन्या दीड महिन्यापूर्वी, मग त्याच्या क्लिप काढून लोकांनी वादंग वादळाला सुरुवात केली. तसं रमेश पतंगे इथे काहीतरी बोलला. तर त्याच्यावर कसं वादंग कधी निर्माण करिता येईल हे होऊ शकतं. महाराष्ट्राचा स्वभाव म्हणा, दुर्दैव म्हणा, काही म्हणा तुम्ही कुठलाही शब्दप्रयोग वापरा. महापुरुषांसंबंधी वादंग निर्माण करणं हा आमचा स्वभाव आहे. आता त्यांनी जसं म्हटलं की शिवाजीमहाराज निर्माण व्हायचे असले तर काय केलं पाहिजे, हा विषय थोडासा बाजूला ठेवू. पण हे वादंग निर्माण होतात, या वादंगाचं करायचं काय? तुम्ही कोणी जरा द. मा. मिरासदारांची शिवाजींची हस्ताक्षरी कथा वाचली असेल तर ती ज्या काळात लिहिली आहे त्या काळातल्या इतिहास संशोधकांमधला वाद आहे की शिवाजीमहाराजांना लिहिता वाचता येत नव्हतं. ते निरक्षर होते. का निरक्षर होते तर इतिहासाचा नियम असा आहे की शिवाजीमहाराजांना लिहिता येत होतं याचा पुरावा



*“ राजकीय पारतंत्र्य आल्याबरोबर मग सांस्कृतिक पारतंत्र्य येतं. धार्मिक पारतंत्र्य येतं. बौद्धिक पारतंत्र्य येतं. सगळं काही येतं. ते एकमेकांचे सहचर आहेत.” श्री. रमेश पतंगे*

काय, तुम्ही म्हणता लिहिता येत होतं. जिजाऊंनी शिक्षण दिलं; सगळं खरं आहे. बखरीत असं म्हणलं तसं म्हणलं तसं म्हणलं. प्रत्यक्ष शिवाजींच्या हस्ताक्षरातलं पत्र उपलब्ध आहे का. नाहीये. मग शिवाजी निरक्षर आहे. इतिहासाच्या संशोधनाच्या कसोट्या लावून काही इतिहास संशोधकांनी काढलेला निष्कर्ष आहे. दुसऱ्यांचं म्हणणं आहे हे असं कसं आहे? शिवाजीमहाराजांचं सगळं घराणं हे सुशिक्षित आहे. विद्याविभूषित आहे. तो अडाणी राहू शकत नाही वगैरे वगैरे. असा तो झगडा तो एका उच्च पातळीवरचा आहे. तात्त्विक पातळीवरचा आहे. मग त्याच्यावर जरा व्यंग करा. द. मा. मिरासदारांनी एक कथा लिहिलेली आहे की शाळेत जाणारा मुलगा आहे आणि गुरुजी त्याला सांगतात की शिवाजीला लिहिता येत नव्हतं. त्याचे वडील इतिहास संशोधक आहेत. तो वडिलांना सांगतो की आपले गुरुजी असं म्हणतात. मग त्या दोघांचा जो झगडा सुरू होतो आणि त्या मुलाची कशी हालत होते. इकडेही मार खा आणि तिकडेही मार खा अशी ती मोठी विनोदी कथा आहे. शिवाजीचे हस्ताक्षर. आणखी एक छत्रपती शिवाजीमहाराजांसंबंधीचा एक प्रवाद आहे. बॉम्बे क्रॉनिकलच्या १९२७च्या अंकांमध्ये एक लेख आहे. त्या लेखामध्ये काय म्हटलेलं आहे की औरंगजेब हा भारतीय ऐक्यासाठी प्रयत्न करत होता. भारतात एक केंद्रीय शासन निर्माण होण्यासाठी प्रयत्न करत होता. शिवाजीने बंडाळी करून त्या प्रयत्नाला खिळ घातली. आता औरंगजेबाच्या कबरीसंबंधी अश्रू ढाळणारी जी गँग आहे ना ती सगळी या प्रकारामध्ये येते. शिवाजीमहाराजांचे कार्य काय? तर औरंगजेबानं एवढं अफाट कार्य सुरू केलं. त्याच्यासारखा सुवर्णकाळ नाही कुठला, असे एक मोठे नेते आहेत, आता नाव नाही घेत त्यांचं, तर त्यांनी हे उद्गार काढलेले आहेत. तर आता यांच्या बुद्धीसंबंधी काय म्हणावं! तर समर्थ रामदास स्वामींनी म्हटलंय की ‘विनायका, सद्बुद्धी दे रे बाबा यांना!’ एवढेच आपण म्हणू शकतो. ते हे असे सगळे अकलेचे तारे तोडणारे खूप विषय आहेत. अफजलखानाच्या वधाचा विषय सर्वांना माहिती आहे. त्याचा जाता जाता ओझरता उल्लेखही केलेला आहे की अफजलखान शिवाजीमहाराजांना भेटीसाठी आला तर शिवाजीमहाराजांनी आपलं हेर खातं सर्व कामाला लावून आणि आपले जे वकील आहेत त्यांनासुद्धा काम देऊन त्याचा हेतू काय, तो कशासाठी येतोय याचा शोध घेतला आणि मग त्याच्यामध्ये शिवाजीला ठार करणं हाच त्याचा हेतू आहे हे स्पष्ट झाल्यानंतर मग त्याला कसा ठार करायचा ही योजना सुरू झाली. आता याच्यासंबंधी इतके काही वादविवाद आहेत की एखाद्याला भेटीला बोलवायचं. हे दोन वेगवेगळे विषय होतात. एक राज्याच्या प्रमुख आहे तो राज्याचा प्रमुख दुसऱ्या राज्याच्या प्रमुखाला भेटीला बोलवतो. असं एखाद्याला बोलवून त्याला ठार करणं हे एक राजनीतीतलं जे तत्त्व आहे, दूत वगैरे वगैरे यांना सन्मानाने वागवावं, त्याच्याशी गद्दारी करू नये, ते मोडलं गेलं. म्हणजे शिवाजींनी राजनीतीचा सिद्धांत मोडला असं लिहिणारे लोक आहेत. लोकमान्य टिळकांना मंडालेची जी शिक्षा झाली, त्याची जी अनेक कारणं आहेत, त्यातलं एक कारण छत्रपती शिवाजीमहाराजांच्यासंबंधी त्यांनी केलेले भाषण आहे. त्यामध्ये अफजलखानाला बोलावून त्याचा कोथळा बाहेर काढणे यात शिवाजीमहाराजांनी कुठलंही गुन्हेगारी प्रकारचं काम केलेले नाही. ईट ईज नॉट ए मर्डर. ती हत्या आहे. अफजखानाचा वध असं आपण म्हणतो. का, तर जो वाईट हेतू घेऊन आलेला आहे त्याला ठार करणं हेच धर्मकर्तव्य आहे. असं आपलं धर्मशास्त्र सांगतं असे अनेक दाखले त्यांनी दिले. आततायीनाम् आगंताम् हन्येत एव अविचारयेत् । असा जो आतताई आला असेल आपल्याला मारायला, त्याला काहीही विचार न करिता ठार करणं हाच धर्म आहे आणि पुढे टिळकांनी म्हटलंय की इंडियन पिनल कोडची कलमं लावून शिवाजीमहाराजांच्या कृतीचं मूल्यमापन करायचं नसतं. त्याचं मूल्यमापन करायचं असेल त्याला वेगळ्या प्रकारच्या वेगळ्या डायमेंशन्स असतात. त्या प्रकारे केलं पाहिजे असे शिवाजीमहाराजांसंबंधीचे वादंगाचे विषय हे उदंड चालू असतात.

इथे समर्थ रामदास स्वामी आणि शिवाजीमहाराजांचे मंदिर बांधलेले आहे. अनेकांच्या डोळ्यात ते खुपतं आणि मग महाराष्ट्रातील ज्यांना जाणता राजाबिजा म्हटलं जातं, ते असेही म्हणतात की रामदास स्वामी शिवाजींचे गुरूच नव्हते. गोब्राह्मण प्रतिपालक हे शिवाजींना ब्रिद लावलं जातं हे चूक आहे. ब्राह्मणांनी शोधून काढलेला हा मंत्र आहे, वाक्य आहे असेही लोक सांगतात. दत्तोपंत ठेंगडी संघातील महान विचारवंत, मजूर संघापासून ते अनेक

संस्थांचे जन्मदाते असं ज्यांचं वर्णन केलं जातं, त्यांनी एका रेफरन्स दिला मला. 'गोब्राह्मण प्रतिपालक' याचा अर्थ काय? गो म्हणजे गाये. गाय हे कृषिप्रधान संस्कृतीचे प्रतीक आहे. गाईपासून बैलांची उत्पत्ती होते. ते सगळे शेतीसाठी कामाला लागतात आणि ब्राह्मण म्हणजे जातीने एका ब्राह्मण कुटुंबात जन्मला म्हणून तो ब्राह्मण असा जातीवाचक त्याचा अर्थ न करिता जो धर्माने चालणारा आहे, न्याय नितीने राहणारा आहे आणि ज्याने गरिबी हे आपला जगण्याचं व्रत म्हणूनच स्वीकारलेलं आहे, त्याचं रक्षण करायचंय म्हणजे धर्माचं रक्षण करायचं, न्यायाचं रक्षण करायचं आणि कृषीचं रक्षण करायचंय या अर्थाने गोब्राह्मण प्रतिपालक या शब्दाचा अर्थ केला पाहिजे. गाय म्हणजे पशू आणि ब्राह्मण म्हणजे जात, आणि मला या जातीचं रक्षण करायचं आणि या पशूचे रक्षण करायचं असला 'पुरोगामी अर्थ' नव्हे.

ही पुरोगामी नावाची महाराष्ट्रामध्ये मोठी जमात आहे ना त्याच्यासंबंधीचा एक विनोद आहे. एके ठिकाणी पैज लागली होती की जो कोणी या गाढवाची मान अशी अशी हलवून दाखवेल त्याला हजार बाराशे रुपये बक्षीस मिळेल. अनेक जण जातात. कोणी त्याचे शेपूट पिरगाळले. कोणी टोचणी मारली, त्याचा कान पिरगाळला पण तो गाढव काय असं असं करायला तयार नाही. मग एक जण गेला आणि त्याच्या कानात म्हणाला, काय रे तू पुरोगामी आहे का? तर तो असं असं करायला लागला. मग लोक विचारायला लागले, 'अरे तू काय बोलला?' तर तो म्हणाला मी एवढंच बोललो की तू पुरोगामी आहेस का. तर ते गाढवसुद्धा म्हणतंय, 'मी पुरोगामी नाहीये.' अशी ही पुरोगामींची भरपूर लोकं महाराष्ट्रामध्ये आहेत. ते असे भिन्न भिन्न प्रकारचे शोध लावतात. एक आणखी शोध लावला की शिवाजीमहाराज म्हणजे काय. तर ते सेक्युलर राज्याचे पहिले जनक. ही वॉज ए सेक्युलर किंग. 'धर्माधिष्ठित राज्य निर्माण केलं, हिंदवी स्वराज्य निर्माण केलं, धर्मरक्षक वगैरे वगैरे ही सगळी बिरुदावली खोटी आहे. का? अहो पाहा ना, त्याचा नौदलाचा प्रमुख कोण होता? दौलतखान होता, तोफखान्यावर कोण होता असाच कोणी तरी नजीबखान वगैरे असेल. तुम्ही नेटवर गेला तर अशी सगळी सरदारांची नावं निघतील. आता ही पुरोगामी मंडळी आम्हाला इतके काही बावळट समजतात की आपण जे काही सांगू ते सगळं खपेल असं त्यांना वाटतं. मग शिवाजीमहाराजांचे जीवनातले हे सगळे प्रसंग तुम्ही जे मघापासून ऐकत आहात यातल्या कुठल्या प्रसंगात मुसलमान आहे हे दाखवा. अफजलखान भेटीच्या वेळी कोण मुसलमान बरोबर आहे अंगरक्षकांमध्ये. पावनखिंड लढवणारा तो बाजी त्याचा बंधू ते बांदलचे सगळे मावळे, तिथे किती मुसलमान आहेत? शाइस्तेखानावर हल्ला केला तेव्हा किती मुसलमान बरोबर आहेत? एखाद्यातरी मुसलमानाचा असं शौर्य

### *श्री. रमेश पतंगे – परिचय*

*हिंदुस्थान प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष असणारे रमेशराव पतंगे हे बालपणापासूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक म्हणून जबाबदारी पार पाडत असताना त्यांनी प्रामुख्याने सामाजिक समरसतेची संकल्पना विकसित करून हिंदुत्व चळवळीस बळकट करण्याचे महत्वाचे कार्य केले. त्यांच्या सक्रिय सहभागातूनच सामाजिक समरसता मंच आणि भटके – विमुक्त विकास परिषदेची स्थापना झाली. या दोन्हींचे ते संस्थापक सदस्य आहेत. सामाजिक समरसतेच्या माध्यमातून त्यांनी 'हिंदू सारा एक' ही भावना जोरकसपणे समाजापुढे मांडली. तसेच समरसता साहित्य परिषदेच्या स्थापनेमध्येही त्यांचा प्रमुख वाटा आहे. समरसता साहित्य परिषदेतर्फे १९९८पासून आतापर्यंत १९ साहित्य संमेलनांचे आयोजन. त्यांनी १७व्या साहित्य संमेलनाची जबाबदारी स्वीकारली.आणीबाणीचा विरोध केल्यामुळे त्यांनी १४ महिन्यांचा तुरुंगवासदेखील भोगला आहे. १९८५ ते २००५पर्यंत साप्ताहिक विवेकचे संपादक – साप्ताहिक विवेक (मराठी), हिंदी मासिक विभाग, विवेक विचार मंच, शैक्षणिक विवेक येथे कार्यरत.*

*'मी, मनू आणि संघ' या त्यांच्या पाचाहून अधिक भाषांमध्ये अनुवादित पुस्तकाद्वारे त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयी जाणीवपूर्वक पसरविण्यात येणाऱ्या अपप्रचारास आपल्या विशेष शैलीद्वारे उत्तर दिले आहे. 'संघसरिता' शीर्षकाखाली जिल्हाश: संघ इतिहासाच्या ग्रंथमालिकेच्या माध्यमातून शून्यातून आजच्या प्रस्थापित झालेल्या संघकार्याचा पूर्ण इतिहास त्यांनी आपल्या डोळ्यासमोर उभा केला आहे.*

*मराठीमध्ये अतिशय सोप्या भाषेमध्ये भारतीय राज्यघटना नेमकेपणाने समजावून सांगणारे त्यांचे आठ पुस्तकांचे लिखाण विशेष ठरले आहे. संविधान या विषयावरील 'आम्ही आणि आमचे संविधान व 'स-संविधानाचा' ही त्यांची दोनही पुस्तके खपाचा विक्रम करणारी झालेली आहेत. सर्व सामान्य माणसाला समजेल अशा भाषेत संविधान संकल्पनेचा परिचय त्यांनी करून दिला आहे.*

*राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते 'पद्मश्री' पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या हस्ते 'नचिकेता' पुरस्काराने त्यांना गौरवण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाचा 'लोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्कार' व 'सर्वोत्कृष्ट वैचारिक वाङ्मयनिर्मिती पुरस्कार' त्यांना प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र शासनाबरोबरच मध्यप्रदेश शासनानेही 'माणिकचंद वाजपेयी राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार' देऊन त्यांना*

*गौरविले आहे. तसेच अखिल भारतीय साहित्य सभेतर्फे 'साहित्य पुरस्कार', श्यामा प्रसाद न्यासातर्फे 'बौद्धिक योद्धा सन्मान' व 'शंकरराव खरात पुरस्कार' आदींनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.*

*ग्रंथलेखन –*

*१. मी, मनु आणि संघ (हिंदी, मराठी, गुजराती, तामिळ, तेलगू आदी भाषांमध्ये अनुवादित)*
*२. संघर्ष महामानवाचा (हिंदी आणि मराठी)*
*३. सामाजिक न्याय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर (मराठी आणि हिंदी)*
*४. डॉ. आंबेडकर आणि राष्ट्रबांधणी (मराठी आणि हिंदी)*

*भारतीय राज्यघटनेवर आठ पुस्तकांचे लिखाण*

*१. आम्ही आणि आमचे संविधान (हिंदी आणि मराठी)*
*२. आपले मौलिक संविधान (हिंदी आणि मराठी)*
*३. आपले संविधान – तत्त्वविचार, मूल्य संकल्पना, ध्येयवाद (हिंदी आणि मराठी)*
*४. अमेरिकन संविधान – ब्रिटिश प्रेरणा आणि अमेरिकन नावीन्य (मराठी)*
*५. ब्रिटिश संविधान – उद्गम आणि विकास (मराठी)*
*६. फ्रेंच संविधान – क्रांती आणि नवीन संकल्पनांची वाटचाल (मराठी)*
*७. स-संविधानाचा... (मराठी, हिंदी, इंग्रजी)*
*८. रशिया – एकपक्षीय राज्यघटना (मराठी)*
*(प्रकाशनाच्या मार्गावर). शिवाय अन्य अनेक ग्रंथ*

म्हणजे तो बाजी पासलकर असेल, नेताजी पालकर असेल, येसाजी कंक असेल, पुरंदर लढवणारा बाजी देशपांडे असेल; असं एखादं तरी नाव शिवचरित्राचा विभिन्न भाग झालेलं असं एकही सापडत नाही. मग शिवाजीमहाराजांनी मशिदींना त्यांची वतनं चालू ठेवली, अमुक ठेवली, तमुक ठेवली, कुठलातरी एक पीर आहे त्याला वर्षासन लावून दिलं, सगळं काही केलं. यात विशेष काय केलं शिवाजींनी? कुठलाही हिंदू राजा हेच करितो. म्हणजे आईने मुलाला जेवू घातलं, दोन वेळेचं जेवू घातलं असं जर कोण सांगायला लागलं तर काय म्हणणार लोकं? काय मूर्खासारखं बडबडतो. मुलाला जेवायला घालणं हे आईचं काम आहे, कर्तव्य आहे. ते तिला परमसुख देणारं आहे. तसं राजे हिंदू आहेत आणि त्यांनी सर्व उपासना पंथांचा आदर केला हे वेगळं सांगण्याची काही गरजच राहत नाही.तर हे सर्व आपली परंपरा आहे. प्राचीन काळापासून चालत आलेली ही परंपरा आहे.

आपली तत्त्वज्ञानाच्या पातळीवरची परंपरा काय? तर आम्ही सहा दर्शनं मानतो. वेदांत, सांख्य दर्शन, पूर्वमीमांसा उत्तरमीमांसा वगैरे वगैरे अशी षट्‌दर्शने येतात. या सर्व दर्शनाचा समन्वय म्हणजे भगवद्गीता. सगळी दर्शनं तिथे अशी गुंफलेली आहेत भगवान श्रीकृष्णाने की एक दर्शन कधी संपतं, दुसरं कधी सुरू होतं हे वाचणाऱ्याला देखील पत्ता लागत नाही. आता एक दर्शन नुसतं घेतलं तर असं लक्षात येतं की अगोदरच्या दर्शनकारांनी जे सांगितलेलं ते खोडून काढणारं दुसरं दर्शन असतं. केवळ सांख्य दर्शनाचा विचार केला तर सांख्य दर्शन काय सांगतं? 'जगाचा निर्माता कोणी परमेश्वर आहे. अनादी अनंत आहे वगैरे वगैरे असं काही नाहीये. जग हे कार्यकारणभावानं चालतं. पुरुष आणि प्रकृती ही दोन तत्त्वं आहेत. या दोन तत्त्वांच्या आधारावर ब्रह्मांडाची उभारणी झालेली आहे.' हे सांख्य तत्त्वज्ञान सांगतं आणि सांख्य तत्त्वज्ञान आमचं तत्त्व नाही असं म्हटलं आपण, आणि त्याचं पालन करायचं म्हटलं तर काय करावं लागेल? आज सकाळी जे काही विधी वगैरे केले ते बंद करावे लागतील. घरातल्या देवमूर्ती आहेत त्या सर्वांना नमस्कार करून त्याचं विसर्जन करावं लागेल की हे काही नाही असं सांख्य म्हणतो. भगवान श्रीकृष्ण तसं नाही म्हणत. भगवद्‌गीतेचा दुसरा अध्याय तो सांख्य दर्शनाचा आहे. हे सगळं तुला जे काय मी सांगितलं अर्जुना हे सांख्य दर्शन आहे. हे स्वीकारलेलं आहे. अशी आपली परंपरा असल्यामुळे, याला नाकार-त्याला नाकार, हा अल्ला भक्त आहे म्हणून तो नको, हा येशू भक्त आहे म्हणून तो नको, अशी आपली परंपरा नाही. पण छत्रपती शिवाजीमहाराज हे आजच्या काळातले सेक्युलर नव्हते. किंवा आणखीन तुम्हाला समजेल अशा भाषेत सांगायचं तर ते गांधी-नेहरूवादी नव्हते. म्हणजे काय, की मुस्लिम समाजाचं टोकाचं लांगुलचालन करायचं, त्याला जे काय पाहिजे त्याला हो म्हणायचं, असे शिवाजीमहाराज नव्हते. जी मंदिरं पाडून मशिदी बांधल्या असं त्यांच्या लक्षात आलं त्या सगळ्या मशिदी त्यांनी उध्वस्त केलेल्या आहेत आणि इतिहासात तुम्ही गेलात, एखाद्या इतिहासकाराचं पुस्तक जर वाचलं मग ते र. गो. सरदेसाईंचं वाचा किंवा ग. ह. खऱ्यांचं वाचा. मग अशी पाडलेली मंदिरं आणि बांधलेल्या मशिदी यांचे उल्लेख तेथे येतील. हे सोयीचे नसतात ना सेक्युलर राजकारणामध्ये! आमचे मुंब्र्याचे राजनेता जर असं बोलायला लागले तर मग मुंब्र्यातील मुसलमानांच्या मतांचं काय होणार हा पोटात भीतीचा गोळा निर्माण होतो. महाराजांसमोर असल्या वोट बँक पॉलिटिक्सचा काही विषय नव्हता. तुम्ही वाईट कृत्य केलेलं आहे ते वाईट कृत्य इथे चालणार नाही. गोव्याची स्वारी झाली त्या वेळेला गोव्यामध्ये पोर्तुगीजांनी मुसलमानाला लाजवील अशा प्रकारचे धार्मिक अत्याचार केलेले

आहेत. वसईमध्ये पोर्तुगीजांचं राज्य सुरू झालं तिथेही त्यांनी अत्याचार केलेले आहेत. 'वसईचा रणसंग्राम' नावाचं पुस्तक आहे द.न.केळकर यांचं, त्यात त्या सगळ्या अत्याचाराच्या कथा आहेत. आपण नाही वाचू शकत. म्हणजे हिंदू माणूस एवढा क्रूर अत्याचार तर करित नाहीच; पण क्रूरतेच्या कथा देखील वाचणं फार कठीण आहे त्याला. असे सगळे क्रूर अत्याचार केले. त्यातल्या चार पादऱ्यांना मराठ्यांनी पकडून महाराजांसमोर उभं केलं. महाराज त्यांना म्हणाले की धर्मांतर बंद करून टाका. ते म्हणाले की आम्ही बंद नाही करणार. का नाही करणार? कारण आमच्या धर्माचा तसा आदेश आहे. की आकाशातील बापाच्या कळपामध्ये मेंढरं आणणं हे आमचं धार्मिक काम आहे. तर मुसलमान म्हणाले की हे काफर आहेत. काफरांना इस्लामची दीक्षा देणं, मुसलमान करणं हे त्याचं धार्मिक पहिलं कर्तव्य आहे तर शिवाजीमहाराज म्हणाले की जर तुमचा धर्म असं सांगतो की जे हिंदू आहेत त्यांना ख्रिश्चन करा, तर माझा धर्म असं सांगतो की जे असं कृत्य करितात त्यांचा शिरच्छेद करा. त्या चारही पादऱ्यांचे शिरच्छेद केलेले आहेत. आता ही कथा 'मराठ्यांच्या इतिहासाची प्रस्तावना आणि साधन' त्या ग्रंथांमध्ये आहे. ग. ह. खरे यांच्या शिवाजीमहाराजांच्या लेखांमध्ये आहे. हे महान इतिहास संशोधक आहेत. आम्ही काय इतिहास संशोधक नव्हे. त्यांनी जे सांगितले ते सांगणार. तर हे त्यांचं म्हणणं जे आहे हे सांगण्याची तुमची हिम्मत होईल का? जीभ होईल का? त्या शिवाजीला आपल्याला पाहिजे तसा रंगवायचा. मग हे ते करत करत असा ते जे काही चाललेलं आहे ते त्याचा प्रतिवाद आपल्याला जिथे जेवढा जमेल तसा चांगल्या आणि सभ्य भाषेमध्ये केला पाहिजे सभ्य कणखर आणि स्पष्ट भाषेमध्ये केला पाहिजे. सहन करिता कामा नये. खोटी गोष्ट सहन करिता कामा नये.

आणखीन शिवाजीमहाराजांचा एका संबंधांमध्ये विचार करणं गरजेचे आहे. ते असं आहे की त्या दाजी नरसी प्रभूला शिवाजीमहाराजांनी जे पत्र लिहिलं त्या पत्रामध्ये महाराज म्हणतात की हे राज्य होणे हे श्रींच्या मनात फार आहे. हे हिंदवी स्वराज्य इथे करायचे हे श्रींच्या मनात फार आहे. म्हणजे काय त्याचा अर्थ होतो. त्याचा अर्थ होतो की मला जे राज्य निर्माण करायचं त्याचं अधिष्ठान 'श्री' म्हणजे परमेश्वर आहे. हे परमेश्वरी कार्य आहे हे शिवाजी शहाजी भोसले नावाच्या तरुणाचं कार्य नाही; तर हे परमेश्वरी कार्य मला करायचं आहे हा संदेश त्यांना द्यायचा आहे आणि हे राज्य निर्माण मला करायचं असल्यामुळे तुम्ही सर्व त्याच्यामध्ये सहभागी व्हा. आता राज्य असा शब्दप्रयोग केल्यानंतर अनेक वेळेला त्याच्या अर्थाचा योग्य तो बोध होतो असं नाही. त्याचं कारण असं आहे की आपण राज्य म्हटलं की शिवाजीमहाराजांचं राज्य कुठपासून कुठपर्यंत होतं? काहीतरी नकाशा वगैरे समोर येतो. औरंगजेबाचं राज्य, मग त्याच्या नकाशावरच्या रेघा लक्षात येतात. इथे राज्य हा शब्द त्या अर्थाने घेऊन नाही चालत. इंग्रजीमध्ये त्याला स्टेट म्हणतात. स्टेट निर्माण होण्यासाठी चार गोष्टी आवश्यक असतात. कुठल्या, एक भूमी लागते, त्या भूमीवर राहणारे लोक लागतात, त्या लोकांचं एक शासन लागतं आणि ते सार्वभौम असावं लागतं. दुसरं कोणी चालवलं असं नाही चालत. असं एक 'स्टेट' हे शिवाजीमहाराजांनी निर्माण केलं. भूमी आहे, त्यात राहणारे लोक आहेत, त्याचं शासन आहे आणि राज्याभिषेक करून ते सार्वभौमत्व हे दाही दिशांना डीक्लेअर करून टाकणं हे हिंदूंचं सार्वभौम अशा प्रकारचं सिंहासन आहे. आता हे राज्य निर्माण झाल्यानंतर जसं प्रत्येक संस्थेचा एक जीवनहेतू असतो, आपण ज्या वास्तूमध्ये बसलोय, ज्या संस्थेमध्ये बसलोय तिथे एक जीवनहेतू आहे. तो डॉक्टर पाटील यांनी आपल्यासमोर फार उत्तम रितीने मांडलेला आहे. तसा राज्याचा जीवनहेतू काय, तर आपल्या राज्यामध्ये न्याय प्रस्थापित करणे. राज्यामध्ये न्यायाची प्रस्थापना करणे हे प्रत्येक राज्यसंस्थेचे मूलभूत कर्तव्य आहे. हा राज्यशास्त्रातील सनातन अपरिवर्तनीय सिद्धांत आहे. मग न्यायाच्या कल्पना वेगवेगळ्या राहू शकतात की आम्हाला अशा प्रकारचा न्याय त्या त्या देशाची भौगोलिक स्थिती, आर्थिक स्थिती, लोकांची स्थिती आपापसातले सगळे संबंध यातून प्रत्येकाच्या राज्याची संकल्पना निर्माण होते. अमेरिकेचं राज्य जेव्हा १८८७ साली निर्माण झालं तेव्हा त्यांनी आपल्या राज्याच्या न्यायाची तत्त्वं सांगितली. कोणती? लाईफ, लिबर्टी अँड परस्युट ऑफ हॅपीनेस. आम्ही राज्य कशासाठी निर्माण करितोय. जीवनाची शाश्वतता, प्रत्येकाला मुक्त स्वातंत्र्य आणि प्रत्येकाला स्वतःचं सुख, स्वतःच्या इच्छेने शोधण्याचा पूर्ण अधिकार. आमचं स्वतंत्र राज्य हे १९५० साली अस्तित्वात आलं म्हणजे काय झालं १९४७ साली देश स्वतंत्र झाला. १९४९ साली या देशाची राज्यघटना तयार झाली आणि तिची अंमलबजावणी १९५०पासून सुरू झाली. म्हणजे १९५०पासून ज्याला भारतीय राज्य म्हणतो हे राज्य पोलिटिकली अस्तित्वात आलं. मग या राज्याचा जीवनहेतू काय सांगितला गेला? राज्यघटनेची उद्देशिका म्हणते की आम्हाला आमच्या राज्यामध्ये सामाजिक न्यायाची निर्मिती करायची आहे. आर्थिक न्यायाची निर्मिती करायची आहे. राजनैतिक न्यायाची निर्मिती करायची आहे. हे सगळे आजचे शब्द झाले. ही सगळी कॉंस्टीट्युशनल लॅंग्वेज झाली. शिवाजीमहाराजांच्या काळी हे शब्दप्रयोग नव्हते. संकल्पना नव्हत्या का? संकल्पना जशाच्या तशा होत्या. हे राज्य, ईश्वराचे राज्य निर्माण करायचे, म्हणजे काय करायचे? ते न्यायावर आधारीतच राज्य निर्माण करायचं. अमेरिकन राज्यघटनेचे शिल्पकार जेम्स मेडिसन. ते तेव्हा फक्त ३४ वर्षांचे होते आणि त्यांनी जी राज्यघटना निर्माण केली अमेरिकेसाठी त्यांनी तेरा राज्यांची अमेरिका पन्नास

राज्यांची केली. जगातील आर्थिक महासत्ता, लष्करी महासत्ता, ज्ञानाची महासत्ता सर्व काय केलं. असं अफाट बौद्धिक कर्तृत्व असलेला असा जेम्स मेडिसन म्हणतो की जर मनुष्य समाज हा देवदूतांमार्फत शासित असेल तर त्याला कायद्याची काही गरज नाही आणि शासन करणारे आणि शासित असणारे दोघेही सत्याने चालणारे, नीतीने वागणारे, कुठल्याही कोणाच्याही धनाची आणि कशाची इच्छा न करणारे, 'इशवास्यमिदंसर्वं' असे वागणारे म्हणजे जेम्स मेडिसन म्हणतो की मनुष्याद्वारे मनुष्याला शासन करण्याचा जेव्हा विषय येतो तेव्हा असंख्य प्रश्न निर्माण होतात. का? मनुष्य असा प्राणी आहे की तो पहिल्याप्रथम भांडकुदळ आहे. कुठल्याही कारणावरून तो भांडण करेल! प्रॉपर्टीची भांडणं तर काय बघायलाच नकोत आणि इथे बहुतेक जे कोकणवासी बसले असतील तर त्यांना या भांडणाची कल्पना असेल. झाडांवरून भांडणं होतील, गुरांवरून भांडणं होतील. कशावरून होणार नाहीत? तर भांडण करणं हा मनुष्याचा स्वभाव आहे. आणि दुसरी गोष्ट अशी की मनुष्य हा असा विकारवश प्राणी आहे. राग, लोभ, द्वेष, ईर्षा, मत्सर, असूया असे सगळे गुणधर्म प्रत्येक मनुष्यामध्ये असतात. असा जर कोणी त्याच्या पलीकडे गेला मग ते, ज्यांच्यामुळे या सर्व वास्तू उभ्या राहिल्या त्या कोटीला जातात. पण अशी माणसं कोट्यावधीमध्ये एखादाच होतो. सर्व सामान्य माणसं आपल्यासारखीच असतात. ती विकारवश आहेत. त्यांच्यावर राज्य करायचे. शिवाजींनासुद्धा तेच करावं लागत होतं. अशा लोकांवर राज्य करायचं म्हणून ते रांझ्याच्या पाटलाचं जे शशिकांत सुतार यांनी उदाहरण सांगितलं अशी कडक शिक्षा करावी लागते. म्हणजे शिवाजी निर्दय होते काय? परंतु त्या काळामध्ये त्याच शिक्षा होत्या. म्हणजे त्या वेळची जी जस्टीस सिस्टीम आहे साडेतीनशे वर्षांपूर्वीची ते डोळे काढणं, हात कापणं, त्या खंडोजी खोपड्याचासुद्धा एक हात आणि एक पाय हा महाराजांनी कापलेला आहे. अशा शिक्षा केलेल्या आहेत. तेव्हा न्याय निर्माण करायचा असेल तर सामाजिक न्यायामध्ये आजच्या परिभाषामध्ये, जे आपण म्हणतो की सामाजिक न्याय करायचा असेल, तर प्रत्येक कामामध्ये सर्वांची सहभागीता हवी. पार्टीसिपेटरी रोल हवा. असं त्याला म्हणतात. मग ते पार्टीसिपेटरी रोल सहज निर्माण होणार नाही. तर कायदेशीररीत्या आरक्षणाची तरतूद करावी लागते. मग निवडणुकीतल्या काही जागा आरक्षित राहतील, महिलांसाठी आरक्षित राहतील, अमुक जातींसाठी आरक्षित राहतील, का, राज्याला न्यायपूर्ण राज्य चालवायचे असेल तर ते रयतेच राज्य व्हायचं असेल तर सर्वांची सहभागीता त्याच्यामध्ये असणे गरजेचे आहे. महाराजांच्या सगळ्या राज्यांमध्ये कोण नव्हते. तिथे कोळी होते, भंडारी होते, आगरी होते, वेगवेगळ्या ज्यांना आपण अस्पृश्य जाती म्हणतो रामोशी, महारजात वगैरे या सर्व जातीची माणसं महाराजांच्या सैन्यात होती. ती जीवाला जीव देणारी होती. तो जीवा महाला हा काय मोठा उच्चवर्णीय होता असा नाही पण त्याच्यावर म्हण पडली, 'होता जीवा म्हणून वाचला शिवा'. तर अशी सगळी माणसं गडकोटकिल्ल्याचं रक्षण करण्यासाठी आणि महाराजांनी ज्या आज्ञा दिलेल्या आहेत की गडावर बाजारबुणग्यांची वस्ती करू नये अजिबात. नाचगाणे करणारे, तमाशा करणारे, दारू पिऊन गोंधळ घालणारे यांना गडावर अजिबात ठेवू नये. हाकलून लावावं सर्वांना. कामाचीच माणसं गडावर असली पाहिजे आणि त्यांची ताकीद अशी असे की जर याच्यामध्ये काही हयगय केली तर मग शासन होईल. महाराज कोणालाही दयामाया दाखवत नसत. शासन करत असत. न्याय करत असताना न्यायधीशासंबंधी असं म्हटलं जातं की लाभ, हानी या सर्वांपासून मुक्त होऊन विचार करणारा, आपल्या इष्टमित्र नातेवाईक यांच्यामध्ये त्यांच्या मोहात पडणारा असा कोणी असता कामा नये. तो सर्वांपासून असा वेगळा असला पाहिजे. त्याची शेकडो उदाहरणे आपल्या प्राचीन इतिहासामध्ये आहे. या मद्रासच्या हायकोर्टाच्या बाहेर एक शिल्प आहे. तिथे चोल राजा होऊन गेला. मनोनिधी चोला नावाचा. या मनोनिधी चोलाने आपल्या राजवाड्याबाहेर घंटा टाकून ठेवली होती आणि त्याची दोरी राजवाड्याच्या बाहेर ठेवली होती. न्यायदानाची जी सिस्टीम केली त्यातून, यांनी निर्णय दिला पण तो मला मान्य नाही, माझ्यावर अन्याय झालेला आहे किंवा त्यांनी प्रतिपक्षाकडून काहीतरी पैसे खाऊन त्याच्या बाजूने न्याय दिलेला आहे. काहीही होऊ शकतं. तेव्हा त्याने ती रस्सी खेचावी आणि आपली फिर्याद राजासमोर मांडावी. ते सुप्रीम कोर्ट आहे ना राजा म्हणजे. तेव्हा एक गाय रस्सी खेचते. राजा आपल्या शिपायांना पाठवतो. शिपाई जातात. बघतात. मग येऊन सांगतात गाईने दोरी ओढलेली आहे. तिला असं वाटलं असावं काहीतरी खाण्याची वस्तू ठेवलेली आहे म्हणून तिने खेचली असावी. पण तो राजा म्हणाला की इतके दिवस झाले रस्सी आपण बांधून ठेवलेली आहे. इतक्या गाई रस्त्यावरून जाता येतात. त्यापैकी कुठली गाय कधी आली नाही. हीच का आली? चौकशी करा. आणि मग लक्षात असं येतं की या गाईचं वासरू रस्त्यामध्ये राजपुत्राच्या रथाखाली चिरडून मेलेलं आहे. राजा त्या राजपुत्राला बोलावतो. त्या काळच्या प्रथेप्रमाणे मृत्यू कोणाचा झाला असेल तर त्याला देहदंडाची शिक्षा दिली जाते. हा पुत्राला देहदंडाची शिक्षा देतो. जसं वासरू मेलं तसाच याला रथाखाली घालून तुम्ही त्याचा वध करा. ते शिल्प मद्रास हायकोर्टाच्या बाहेर केलेलं आहे. आतमध्ये बसलेले जे न्यायमूर्ती आहेत त्यांनी हा आदर्श समोर ठेवावा. प्राचीन परंपरेचा आदर्श आहे.

महाराजांच्या जीवनात असे अनेक प्रसंग आहेत. कानोजी जेधे हे शहाजी राजांनी आपले अत्यंत विश्वासू सरदार म्हणून

महाराजांबरोबर जहागिरीत पाठवलेले आहेत. त्या कान्होजी जेधे यांचं इतिहासात खूप महत्त्वाचं स्थान आहे. अफजलखान वधानंतर खंडूजी खोपडे हासुद्धा एक वतनदार होता. हा एक फर्मान आल्यामुळे घाबरून अफजलखानाला जाऊन मिळाला. तसं फर्मान कान्होजी जेधे यांनासुद्धा आलं होतं. महाराज त्यांना म्हणाले की तुम्हीही जा. बाकी गेले तसे तुम्हीही जा.तेव्हा कान्होजी हातावर पाणी घेऊन सोडून देतात, ''हे वतनावर पाणी सोडून दिलं मी. गेलं वतन चुलीत, महाराजांची साथ सोडणार नाही.'' असा हा साथीदार आहे. मग पारडं फिरलं. अफजलखान गेला. खंडोजी खोपडे यांच्याशी त्यांची पूर्वापार मैत्रीच होती. दूरचे नातेसंबंध देखील होते. कान्होजी जेधे महाराजांना म्हणाले की खंडोजी खोपड्यांचं चुकलं. एकवार तुम्ही त्याला जीवदान द्या. कान्होजी वयाने मोठे आहेत. पण एका दिवशी दरबारामध्ये खंडोजी खोपडे आला असताना महाराजांनी आदेश सोडला, 'याला धरा. याचा उजवा हात आणि डावा पाय कापून टाका.' न्याय असा करावा लागतो. सर्वांना बरोबर घेऊन जायचं आहे. मुसलमानी अमलामध्ये जे अनंत अत्याचार झाले त्यात सर्वाधिक अत्याचाराच्या शिकार महाराष्ट्रातील हिंदू महिला झालेल्या आहे. तेव्हा रामदास स्वामींनी म्हटलं, 'किती गुजरिणी ब्राह्मणी भ्रष्टविल्या । किती सुंदरा हाल होउनी मेल्या । किती एक त्या देशांतरी विकल्या । काय त्याची गणतीच नाही ।' कोणाच्याही घरात त्याची पत्नी सुंदर आहे, मुलगी सुंदर आहे, उचलावी आणि घोड्यावर टाकावी आणि घेऊन जावी हे सगळे प्रकार जे आहेत ते महाराजांनी अत्यंत कठोरपणे बंद केलेले आहेत. कल्याणच्या सुभेदाराचा सुनेचा उल्लेख झाला मघाशी, ती ऐतिहासिक आहे का कपोलकल्पीत आहे याच्यावरही वाद विवाद चालू असतात. रायबागीनीच नाव येतं. इथून जवळच्या पालीजवळच्या उंबरखिंडीमध्ये त्या कारतलबखान उजबेगीली महाराजांनी कोंडला आणि नंतर एका लढाईमध्ये ती रायबागन हरली, महाराजांच्या सैनिकाच्या हातात सापडली. तिचा सन्मान केला शिवरायांनी. कुठल्याही स्त्रीचा मग ती आपल्या विरुद्ध बाजूने लढते, काय करते म्हणून तिला कत्तल करा, तिचा अपमान करा, तिला बेइज्जत करा हे चुकूनही महाराजांनी केलेलं नाही. तेव्हा न्याय द्यायचा आहे तर समाजातील सर्वांना न्याय दिला पाहिजे.

शेतकरी हा राज्याचा कणा आहे. आजही किती औद्योगिकीकरण झालं, अत्याधुनिक मोबाईल जरी आपल्या हातामध्ये आले तरी एखादं वर्ष पावसाविना गेलं महाराष्ट्रामध्ये तर काय हाल होतील आपले हे आपण जाणू शकतो. पिण्याच्या पाण्यापासून खाण्यापर्यंत. तर शेतीवर अवलंबून असणं हे भारताची नियती आहे आणि म्हणूनच शेतीच्या संदर्भामध्ये महाराजांनी शेतकऱ्यांची किती काळजी घेतलेली आहे. महाराज कधी कोणा शेतकऱ्याला रोख रक्कम देत नसंत. तुझं काय नुकसान झालेलं आहे? परकीय आक्रमण झाल्यामुळे तुझी अवजारे गेली आहेत, तुझी गुरं पळवून नेलेली आहे, मग तुला गुरं दिली जातील. तुला अवजारं दिली जातील. तुझ्याकडे पेरायला धान्य नाही मग धान्य दिलं जाईल म्हणजे जे वस्तुरूपाने आवश्यक आहे ते दिलं जाईल. पैसारुपाने दिलं की माणूस काय करतो की ज्याच्यासाठी पैसा घेतला त्यासाठी खर्च करेल असं नाही. माझ्या पोरीचं लग्न अडलेलं आहे ते करू, आता घर पडलेलं आहे ते करू. पैशाला जाण्याच्या अनंत वाटा असतात. महाराज अतिशय व्यवहारचतुर, चाणाक्ष होते. लोक काय व्यवहार करतील वागतील त्यांना माहीत होतं. पण जे नुकसान झालं ते त्यांनी दिलं. पुण्याजवळ एक आंबील ओढा आहे त्या ओढ्यावर त्यांनी धरण बांधलं. आजही तुम्ही तेथे जाऊन बघू शकता. खंडवा नावाचं पुण्यातलं त्या वेळेचं जे खेडं आहे ते आता पुण्याचाच एक भाग झालेलं आहे. तिथेसुद्धा एक धरण बांधण्याचं काम त्यांनी सुरू केलं. प्रचंड मोठा खडक लागला खणताखणता आणि तो पूर्ण लगेच फोडणं शक्य नव्हतं म्हणून ते काम जिवाजी नावाच्या मजुराकडे दिलं. आणि म्हणाले की मी परत येईपर्यंत हा खडक फोडून ठेव. त्याने सगळा खडक पार उध्वस्त करून टाकला. महाराज आले, प्रसन्न झाले. त्यांनी त्याला काही रोख रक्कम देऊ केली. तो म्हणाला, महाराज मला पैका नको. पैका दिला तर तो खर्च होईल. तुम्ही मला जमीन द्या. ती जमीन कायम राहील माझ्याकडे आणि माझे प्रश्न संपतील. माझ्या मुलाबाळांचे प्रश्न संपतील. हे महाराजांचं धोरण आहे.

आपल्या जवळच चिपळूण आहे. तर त्या चिपळूणच्या ठाणेदाराला लिहिलेलं महाराजांचं पत्र खूप प्रसिद्ध आहे. आणि त्या पत्रामध्ये महाराजांनी ताकीद दिली आहे की पावसाळा सुरू होण्याच्या आत सर्व प्रकारची बेगमी करून ठेवा. अन्नधान्य लागतं ते भरून ठेवा. घोड्यांना दाणा-वैरण, चारा लागेल ते भरुन ठेवा. फाटे गोळा करून ठेवा. पावसाळ्यात सुकी लाकडे मिळणार नाहीत आणि आता आहे म्हणून मौज मजा करुन वाटेल तसं खाल आणि पावसाळ्यात मग काय कराल? त्यांनी ताकीद दिली की गावात जाऊन शेतकऱ्यांना त्रास देऊन त्यांच धान्य, भाजीपाला, त्यांची फाटे, फळं आणणं अशा जर गोष्टी कराल तर रयत म्हणेल अरे तुम्ही आणि मोगलात काय फरक राहिला. ही तर मोगलाई सुरू झाली. त्यांचा तळतळाट लागेल. मराठीयांची तो अब्रू राहणार नाही.

आर्थिक न्यायाचाही विषय त्यांनी असा केला आणि आपल्या राज्यामध्ये व्यापाऱ्यांना कोणी विनाकारण त्रास देऊ नये. नाहीतर आमचं राज्य इथे होतं ना अडीच वर्षांपूर्वी! आम्ही मुंबईतले पत्रकार त्याचं वर्णन करत असे की हे खंडणी वसूल करण्याचं राज्य आहे आणि मग त्याच्या इतक्या तक्रारी छोट्या मोठ्या व्यापारी आणि उद्योजकांकडून येत असत. मग हा आज

आला, मग त्याचा फोन आला आज, इथे काय याची जयंती आहे, त्याची मयंती आहे, हा उत्सव आहे, द्या देणगी! मग निवडणूक आहे असे हे वसुलीचं व्यापाऱ्यांना त्रास देणं. मग ते व्यापारी एखाद्या मर्यादेपर्यंत सहन करितात. मग सगळा व्यापार गुंडाळतात आणि जिथे त्रास होणार नाही अशा प्रदेशात निघून जातात. मग बोंबाबोंब करायची. कारखाने गुजरातने पळवले. कारखाने यांनी पळवले. अरे तुम्ही त्यांना इथे जगूच दिलं नाही. राहू दिलं नाही. त्यांना सहजपणे व्यवहार करिता येईल असं वातावरण ठेवलं नाही. तर ते इथे कशाला राहतील ते. जिथे त्यांना मिळेल तिकडे जातील ते. महाराजांनी या सर्व गोष्टी अत्यंत कटाक्षाने केलेल्या आहेत. आज आपण बातम्या अशा ऐकतो की ट्रंपने कॅनडाच्याकडून जो काही माल येतो त्याच्यावर जबरदस्त जकात बसवली. तुमचा माल स्वस्त येतो. लोक तो खरेदी करितात. आमच्याकडे कारखाने उभे राहिले पाहिजे. आमच्याकडे उद्योजक उभे राहिले पाहिजे. आमच्या तरुणांना रोजगार मिळाले पाहिजे. आमच्या तरुणांना बेकार ठेवून तुमच्या देशाचे पोट भरण्याचे हे धंदे मी नाही करणार असं ट्रंपने ठरवलं. महाराजांनी हे साडेतीनशे वर्षापूर्वी ठरवलं. बाहेर देशातून मीठ येत असे आणि आपल्याकडे मिठागरं होती पण आपलं मीठ त्या मानाने महाग असायचं. मग महाराजांनी मिठावर जबरदस्त जकात बसवली आणि ते जकात धरून मीठ विकायचं म्हटलं तर देशी मिठापेक्षा ते महाग झालं. ते बंद झालं. याला प्रोटेक्टीव्ह टॅरीफ म्हणतात. हे महाराजांनी त्या काळामध्ये अमलात आणलेले आहे.

हे इंग्रज व्यापारी वगैरे व्यापारातले धूर्त समजले जातात. तर या इंग्रज व्यापाऱ्याकडून महाराजांनी एकदा तांबं विकत घेतलं आणि लगेच पैसे दिले नाहीत त्यांना. म्हणाले की आमच्याकडे पैशाची जाम तंगी आहे. रायगडावर काही रोख रक्कम वगैरे तर काही नाही तेव्हा थोड्या दिवसांनी आम्ही तुम्हाला देऊ पण तुम्हाला एक प्रॉमिसरी नोट लिहून देतो. काही महिन्यांनंतर इंग्रज परत इकडे आले व म्हणाले, 'ते तांबं घेतलं त्याचे पैसे द्या.' तिथला खजिनदार म्हणाला की आत्ताही पैसे नाहीत. आम्ही पैसे देऊ शकत नाही पण त्या वस्तूच्या किमतीइतक्या जीनसा तुम्हाला आम्ही देऊ शकतो. मग तो जीनसा देणारा जो एक सुभेदार आहे त्याच्याकडे याला पाठवून दिला पत्र देऊन वगैरे. त्या सुभेदाराने ते पत्र वाचलं आणि तो म्हणाला की जिनसा वगैरे द्याव्यात वगैरे असं तुम्ही म्हटले हे सगळं खरं आहे परंतु त्या ज्या वखारीमध्ये ते आहेत त्या वखारीला मी आज्ञा काय देऊ शकत नाही. तो अधिकार मला नाहीये. त्या वखारप्रमुखाच्या नावाने तुम्ही पत्र आणा आणि तिकडे जा. असं करत करत महाराज त्यांना दोन वर्षे नाचवत ठेवतात. तो मजेशीर किस्सा आहे. तेव्हा ज्याच्याशी व्यापार करायचा आहे तो अनंत लबाड्या करतो हे माहीत आहे. मग त्याच्याशी सचोटीने व्यापार करून नाही चालत तर त्याला त्याच्या भाषेतच उत्तर दिले पाहिजे. 'खटाशी असावे खट' ही रामदासस्वामींची उक्ती आहे तिचे महाराजांनी तंतोतंत पालन केलेलं आपल्या लक्षात येतं.

लोकशाहीमध्ये प्रत्येकाला भाषण स्वातंत्र्य दिलं पाहिजे, आवडीचे संघटन निर्माण करण्याचं स्वातंत्र्य दिलं पाहिजे, आंदोलन करण्याचं स्वातंत्र्य दिलं पाहिजे, आपलं गाऱ्हाणं मांडण्याचं स्वातंत्र्य दिलं पाहिजे; याला राजकीय न्याय असं म्हटलं जातं. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या काळामध्ये आणि लोकशाही वगैरे वगैरे अशा काही संकल्पना जरी अस्तित्वात नसल्या तरी भारतीय राजनीती शास्त्राप्रमाणे राजनैतिक न्याय उत्पन्न करायचा असेल तर राज्याच्या सगळ्या अंगांमध्ये ज्याच्याकडे जी गुणवत्ता आहे त्या गुणवत्तेला वाव मिळेल असं त्याला काम दिलं पाहिजे. बहीर्जी नाईक हा महाराजांचा महान हेर झाला. त्याने हेरगिरीसाठी काय काय उचापती केल्या असतील त्याच्या कवी कल्पना करून लेखक कादंबरीकार वगैरे सांगत असतात. तर हा बहिर्जी नाईक हा काय ब्राह्मण कुळातला नाही ना. त्याच्यामध्ये ते हुन्नर आहे. ज्याच्याकडे ज्या प्रकारची गुणवत्ता आहे त्या गुणवत्तेनुसार राज्य व्यवहारांमध्ये त्याला सर्व प्रकारचे स्थान दिलं. अष्टप्रधान मंडळ निर्माण करून प्रत्येकाला त्याच्या त्याच्या गुणवत्तेप्रमाणे काम दिलेलं आहे हे लक्षात येईल. म्हणून सोशल जस्टीस, इकॉनॉमिक जस्टीस, पोलिटिकल जस्टीस महाराजांच्या काळामध्ये हे शब्द जरी नसले तरी त्याचा तंतोतंत अंमल हा त्यांनी केलेला आहे.

पण राज्याचा आदर्श शिवाजींचा धरायचा म्हणजे काय करायचं? पंतप्रधानांनी ३२ मणांचं सोन्याचं सिंहासन निर्माण करून त्यावर बसायचं नाहीये. तर महाराजांनी ज्या तत्त्वाने राज्य केलं ही तत्त्व आपल्या राजव्यवहारात कशी अमलात याचा विचार केला पाहिजे. या सरकारमध्ये असलेले अनिल दवे यांचं या सगळ्या महाराजांच्या राजनितीसंबंधांमधलं अप्रतिम पुस्तक आहे. महाराजांची धोरणं-आजची धोरणं, महाराजांचं कृषी धोरण - आजचं कृषी धोरण. कुठे कुठे लुपहोल्स आहेत? कुठे कुठे स्वीकारायला जागा आहे? महाराजांची आणि आजची विदेश निती. तर हे असं शिवाजी जगायचा म्हणजे तो सर्वार्थाने जगावा लागतो. कुटुंबात जगावं लागेल तसं सार्वजनिक जीवनामध्ये जगावं लागेल आणि विशेषतः राजनीतीमध्ये तर त्याची नितांत आवश्यकता आहे. हे जगावं लागेल.

शेवटी महाराजांचा विचार करत असताना आणखी एक शब्द आधुनिक काळातला जो वापरला जातो तो म्हणजे क्रांतिकारक. सावरकरांचा उल्लेखसुद्धा क्रांतिकारक स्वातंत्र्यवीर सावरकर असाच केला जातो. क्रांती याचा अर्थ असा होतो (इंग्रजी शब्द 'रिव्होल्युशन')की अकस्मात झालेला मुलगामी बदल.

म्हणजे केवळ सत्ता बदल नव्हे तर समाज व्यवस्थेमधला बदल, अर्थव्यवस्थेमधला बदल, लोकांच्या धर्मव्यवस्थेमधला बदल असा सर्वंकश बदल घडवून आणणाऱ्या ज्या घटना घडतात त्याला क्रांती म्हणतात. अशा क्रांत्या रोज होत नसतात. युगातून एखादीच होते. फ्रेंच राज्यक्रांती त्याचं उदाहरण आहे. रशियन राज्यक्रांती त्याचा उदाहरण आहे. अमेरिकन राज्यक्रांती लिमिटेड अर्थामध्ये त्याचं उदाहरण आहे. शिवाजीमहाराज हे भारतातील अनेक बाबतीतले पहिले क्रांतिकारक आहेत. पहिली क्रांती त्यांनी केली की तीनशे साडेतीनशे वर्ष पारतंत्र्यात लोळणारा महाराष्ट्र आहे. तेव्हा लोकांची मानसिकता अशी झाली की नंदाचं क्षत्रिय कुल झाल्यानंतर क्षत्रिय कुलाचा अंत झाला. आता क्षत्रिय कुणी राहिले नाहीत आणि कलियुगात म्लेछांचेच शासन राहणार आहेत. आपले लोक मोठे पंडित, मोठे विद्वान, हुशार असतात ना!

आता या युगात म्लेछांचे राज्य. आपल्याला त्यांचं अनुकरण करायचं आहे. मग त्यांची भाषा अवलंबायची. मग त्याचे रितीरिवाज अवलंबायचे. आपल्या पोराबाळांची नावं त्यांच्या नावावरून ठेवायला सुरुवात करायची. असं राजकीय पारतंत्र्य आल्याबरोबर ते मग सांस्कृतिक पारतंत्र्य येतं. धार्मिक पारतंत्र्य येतं. बौद्धिक पारतंत्र्य येतं. सगळं काही येतं. ते एकमेकांचे सहचर आहेत. ते असं सगळं असताना याच्यामध्ये शिवाजीमहाराजांनी इथे आपलं राज्य निर्माण होऊ शकतं हे सिद्ध केलं. ही जबरदस्त मानसिक क्रांती आहे. त्याचं एक उदाहरण सांगायचं म्हणजे नागपूरला एक शिक्षकांची परिषद होती. या परिषदेला बंगालमधले आणि देशभरातील अनेक शिक्षक आले होते. त्या परीषदेत बंगालच्या एका शिक्षकाने म्हटलं की नागपूरकर भोसले यांना आम्हाला भेटायचं आहे. राजांना नमस्कार करायचा आहे. ती सगळी व्यवस्था कार्यकर्त्यांनी करुन दिली. ते त्या महाराजांना भेटायला गेले. तेथे रघुजी भोसले यांचे वंशज आहेत. त्यांना ऐकू कमी येत होतं. ते त्यांचं नशीब समजायचं. तेव्हा औपचारिक झाल्यानंतर मुख्य मुद्द्याला त्यांनी हात घातला. आमचा तुम्हाला एक प्रश्न आहे की मराठे हुबळी नदीपर्यंत येऊन का थांबले? हुबळी नदी पार करून ढाक्यापर्यंत का नाही आले? आता हा यांचा नातू की पणतू ज्याने कधी तलवार बिलवार पण चालवली नसेल. आता ऐकायला पण कमी येतं. त्यांना काही समजेना याचा प्रश्न काय आहे. तेव्हा त्याचे बाकीचे कारभारी होते ते म्हणाले की असा प्रश्न का विचारता. तर एवढ्यासाठी विचारतो ज्या भूमीला मराठ्यांचे पाय लागले ती भूमी भारतात राहिली आणि ज्या भूमीला मराठ्यांचे पाय लागले नाहीत त्याचा पाकिस्तान झाला. ढाक्यापर्यंत हे जर आले असते तर ढाका भारतातच राहिला असता. ही महाराजांची स्वातंत्र्याची जबरदस्त प्रेरणा आहे. महाराजांचं हे जबरदस्त क्रांतिकार्य आहे. सती प्रथा बंद करण्याचा सगळा मान सन्मान राजा राममोहन रॉय यांना दिला जातो. दिलाही पाहीजे. त्याच्याविषयी चर्चा, वादविवाद करण्यात काही अर्थ नाही. ज्या काळात सती प्रथा थांबवणं ही सोपी गोष्ट नाही त्या काळात जिजाऊ आईसाहेबांना सती जाण्यापासून महाराजांनी रोखलेलं आहे. म्हणजे एक धर्मप्रथा अशी आहे ती महाराजांनी मोडलेली आहे. बाबाजी निंबाळकर मुसलमान झाला त्याला महाराजांनी हिंदू करून घेतला. आज देशभर विश्वहिंदू परिषद आणि आर्य समाज, अनेक संघटना या सर्व संघटना आपापल्या परीने घरवापसीचा कार्यक्रम करतात. त्याला धर्मांतर म्हणत नाही. तुम्ही पूर्वी ज्या घरामध्ये होता त्याच घरात परत या. त्याला घरवापसी म्हणतात. राजस्थानमधला फार मोठा मुस्लिम समाज जो रजपूत होता जो मुसलमान झाला. त्याला तिथल्या मेवाडच्या महाराणांच्या आशीर्वादाने आठदहा वर्षांपूर्वी हिंदू करून घेण्यात आलं. या कामाची पहिली सुरुवात ही छत्रपती शिवाजीमहाराजांनी केलेली आहे. बाबासाहेब आंबेडकरांच्या शब्दात सांगायचं तर हिंदू धर्म कसा आहे? तर घरावर ठेवलेल्या टाकीसारखा आहे. त्या टाकीला आउटलेट आहे. आतमध्ये पाणी सोडण्याचा नळ खुला आहे. इनलेट. आत सोडणाऱ्या पाण्याचा नळ तो शिसं लावून बंद केला आहे. जोपर्यंत पाणी आहे तोपर्यंत नळाला पाणी येईल. पाणी आटलं की काही राहणार नाही. तसा हिंदू समाजामधून बाहेर जाण्यासाठी सगळ्यांना मोकळा आहे. मुसलमान व्हायचं? हो. ख्रिश्चन व्हायचं? हो. आणखीन काय व्हायचं? शिवधर्म करायचा आहे? कर! काय वाटेल ते कर. आतमध्ये येण्याचे दरवाजे बंद. आतमध्ये आलेला माणूस पहिला प्रश्न विचारतो मी हिंदू होतो पण माझ्या मला दोन मुली आहेत. दोन मुलं आहेत. मुलांचे लग्न कसेतरी मी करीन. मुलींशी लग्न कोण करणार? हिंदू समाजाकडून या प्रश्नाला जोपर्यंत उत्तर दिले जात नाही तोपर्यंत घरवापसी ही अतिशय अवघड गोष्ट आहे. त्याला उत्तर द्यावं लागेल. ते महाराजांनी दिलं. मग महाराजांचा आदर्श घ्यावा लागेल. आपली मुलगी बाबाजी निंबाळकर यांच्या मुलाला देऊन. राजाच आपली मुलगी देतो बाटलेल्या, बाटून परत हिंदु झालेल्याला तर मी का नाही करू? 'महाजनो येन गता स: पन्थ: ।' तसं थोर माणसं ज्याप्रमाणे वागतात त्याप्रमाणे वागायचं असतं.

भाषा शुद्धीची सर्व चळवळ स्वातंत्र्यवीर सावरकरांनी चालवली. अनेक शब्द आपण वापरतो फलाट, महापौर वगैरे वगैरे हे सर्व सावरकरांनी दिलेले शब्द आहेत. या भाषाशुद्धीची सुरुवात छत्रपती शिवाजीमहाराजांनी केली. मराठीमध्ये घुसलेले सगळे शब्द फारसी, उर्दू हे सगळे त्यांनी बाहेर काढले. 'राजव्यवहार कोश' पंडित रघुनाथांकडून तयार करून घेतला आणि त्याचं चलन त्यांनी सुरू केलं. तेव्हा अशा अनेक बाबतीत 'दी फर्स्ट' असं नाव छत्रपती शिवाजीमहाराजांचं घ्यावं लागते आणि शेवटी महाराजांच्या युद्ध

कौशल्य मॅनेजमेंट वगैरे वगैरे या संदर्भामध्ये त्या त्या क्षेत्रातील मंडळी त्या अंगाने त्याचा अभ्यास करून भरपूर लिखाण करत असतात. पण ज्यांना आधुनिक संदर्भामध्ये शिवाजी समजून घ्यायचा असेल त्यांनी ते वाचन करणं फार गरजेचं आहे. घटना प्रसंग वगैरे वगैरे कसे असतात. एका विशिष्ट वयामध्ये ते स्फूर्ती निर्माण करितात. पण आता तेच जर दहाव्या वर्षी तेच ऐकलं, तिसाव्या वर्षी तेच ऐकलं, साठाव्या वर्षी पुन्हा तेच सांगायला लागलो तर महाराजांचं जीवनतत्त्व आपल्याला फार कळलं असं होणार नाही. म्हणून त्याच्यासाठी थोडसं याच्यापलीकडे जावं लागतं. अफजलखानाची मोहीम घेतली, त्याला फाडला बिडला, सगळं ठिक आहे. तो विषय बाजुला ठेवला तरी त्याची मॅनेजमेंट कशी आहे, त्याचं प्लॅनिंग कसं आहे, किती मायन्युट प्लॅनिंग आहे, प्रत्येक बाबतीतलं कसं प्लॅनिंग आहे. विदेश नीतीमध्ये महाराजांनी कोणत्या तत्त्वांचा अवलंब करून आणि त्याला चितपट केलेला आहे. गनिमी काव्याचा विषय आहे, तो कसा अवलंबिला. याचा अभ्यास हे जगातले लोक करितात. 'हो ची मिन्ह' हा २७ वर्षं अमेरिकेशी विएतनाममध्ये लढला. जसा महाराष्ट्र लढला औरंगजेबाशी, तसा 'हो ची' लढला. त्या 'हो ची मिन्ह'नं म्हटलं की आमचं लढायचं स्फूर्तिस्थान, प्रेरणास्थान हे छत्रपती शिवाजीमहाराज होते. तो मार्क्स विषयी नाही सांगत, रशियाविषयी नाही सांगत! रशिया चीनकडून शस्त्र मिळाली त्याला भरपूर. परंतु लढायचं कसं, गनिमी कावा कसा अवलंबायचा हे शिवाजीकडून शिकले.

आपल्यालाही ते शिकलं पाहिजे. आजच्या काळाच्या संदर्भात त्याचा सगळ्याचा विचार करणं गरजेचं आहे. काही वेळेला बौद्धिक गुलामीच्या आहारी जाऊन आणि मग नको त्या गोष्टींची आपण तुलना करायला लागतो. काही जण छत्रपती शिवाजीमहाराजांची नेपोलियनशी तुलना करितात. नेपोलियनसारखा सेनापती जगामध्ये झाला नाही असं युरोपीयन इतिहासकारांचं म्हणणं आहे आणि युरोपचा इतिहास म्हणजे जगाचा इतिहास असं आम्ही शाळेत शिकत असल्यामुळे आपणही तेच मानतो. हा नेपोलियन एकदा लढाई हरला. आणि त्याला एल्बा बेटावर जावं लागलं. तिथून तो पळून आला हा भाग वेगळा. दुसरी लढाई हरला वॉटरलुची आणि मरेपर्यंत त्याला तुरुंगात राहावं लागलं. हे शिवाजीच्या नशिबात नाहीये. नेपोलियन आपलं सैन्य मरायला रशियात टाकून आणि निवडक लोकांना घेऊन फ्रान्समध्ये परत आला. जाताना सात-आठ लाख सैन्य त्याने नेलं होतं. जिवंत आलं फक्त चाळीस-पन्नास हजार. बाकी सगळे तिथल्या थंडीत मेले किंवा रशियन सैन्यानं त्यांना कापून काढलं. महाराजांची अशी कोणतीही लढाई नाही की 'आप लढो, मै भागता हूं। कपडे संभालता हूं। शिवाजीशी तुलना होऊ शकेल असा सेनापती असा राजनैतिक धुरंदर युरोपच्या इतिहासामध्ये कोणीही सापडणार नाही. म्हणून त्या भानगडीत आपण पडता कामा नये. कोणी करायला लागला तर त्याला त्याच्या समजेल अशा भाषेत उत्तर दिलं पाहिजे. माझ्या पूर्ववक्त्यांइतकं अमोघ वक्तृत्व माझ्याकडे नाहीये किंवा तुमच्या भावनेला हात घालेल अशा प्रकारचे प्रसंग सांगण्याचंसुद्धा माझ्याकडे कौशल्य नाहीये. तरीसुद्धा शांतपणे ऐकून घेतलं त्याबद्दल धन्यवाद.'

यानंतर आभारप्रदर्शन आणि वरयाचना पठण होऊन सभेची सांगता झाली.



### *शिवजयंतीची कृतार्थता – रमेश पतंगे*

*श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संस्थेतर्फे शिवजयंती उत्सवाचं निमंत्रण मला आलं, ते निमंत्रण मी स्वीकारलं. डेरवण आणि तेथील शिवसृष्टी याबद्दल मला ऐकून माहीत होतं. प्रत्यक्ष तिथे जाण्याचा योग कधी आला नव्हता. न पाहिलेल्या वास्तूसंबंधी आपल्या मनात काही प्रतिमा उभ्या राहतात, तशा त्या माझ्या मनातही होत्या. कुठेही भाषण करायला जाणं, हे माझं नावडतं काम असतं. परंतु पद्मश्री प्राप्त झाल्यानंतर सगळ्याच भाषणांची निमंत्रण नाकारता येत नाहीत, कार्यक्रमाला जाणं सामाजिक कर्तव्य ठरतं, म्हणून मी सपत्निक गेलो. तेथे मी केलेल्या भाषणाने श्रोत्यांचे किती प्रबोधन झाले असेल मला माहीत नाही, परंतु मी स्वतः मात्र पुण्यपावन झालो. शिवजयंती म्हटली की, उत्साह, ढोलताशांची मिरवणूक, छ. शिवाजीमहाराजांवरील गाणी, थोडं नृत्य असतं. सकाळी आठच्या सुमारास मी स्वामी सहजानंदसरस्वती वास्तूत पोहोचलो. काकामहाराज तेथे स्वागताला होते. मुख्य वक्त्या सायली गोडबोले–जोशी, प्रा. कानिटकर, माजी मंत्री शशिकांत सुतार आदी मान्यवर उपस्थित होते. टापटीप, रेखीवपणा, कसलाही गडबड गोंधळ नाही, सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे वक्तशीरपणा याची सुरुवातच न्याहारीपासून झाली. यानंतर मान्यवरांना फेटे बांधण्याचा कार्यक्रम सुरू झाला.*

*फेटे बांधून झाल्यावर बरोबर साडेआठ वाजता वास्तूतच उभ्या केलेल्या गडाच्या प्रतिकृतीकडे ढोलताशांच्या गजरात मिरवणुकीला सुरूवात झाली. छ. शिवाजीमहाराजांचा अश्वारूढ पुतळा आणि समर्थ रामदास स्वामींची आणि तुकोबांची पूर्णाकृती असलेल्या मंदिरात जाऊन महाराष्ट्राच्या तिन्ही दैवतांची पूजा केली. प्रमुख अतिथी मी असल्यामुळे हा माझा सन्मान होता. त्यानंतर मंदिराला प्रदक्षिणा घालून ध्वजस्तंभाकडे आलो. भगव्या ध्वजाचे वेदमंत्रानी पूजन झाले. ध्वजारोहण झाले आणि स्वामीजीरचित भगव्या ध्वजाच्या प्रार्थनेचे सामूहिक पठण झाले. यानंतर सगळे मान्यवर व्यासपीठावर स्थानापन्न झाले. पूर्वनियोजित वेळेप्रमाणे नऊ वाजता कार्यक्रम सुरू झाला. मी धरून चार वक्त्यांची भाषणे झाली. निवेदिकेकडे निवेदनाबरोबरच प्रास्ताविकेचे काम असल्यामुळे पाच जणांची भाषणे झाली असे म्हणायला पाहिजे. प्रत्येकाचे भाषण आखीव आणि रेखीव.*

*सायली गोडबोले–जोशी यांनी जिजाऊंचे थोरपण अनेक ऐतिहासिक दाखले देऊन मांडले. प्रा. कानिटकरांनी सावरकरांच्या जीवनातील शिवाजीपण मांडले. डॉ. सुवर्णा पाटील यांनी श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टतर्फे चालणाऱ्या अनेक उपक्रमांची माहिती दिली. या सर्व उपक्रमांचे पूर्वदर्शन मी आदल्या दिवशी घेतले होते. प्रशस्त रुग्णालय, कॅन्सर हॉस्पिटल, पूर्व प्राथमिक ते महाविद्यालयापर्यंतचे शिक्षण, प्रयोगशाळा, विज्ञानकक्ष, अवकाश कक्ष, महिला सक्षमीकरणाचे वेगवेगळे उपक्रम, आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडासंकुल, आदी सर्व पाहून झालेले होते.*

*छ. शिवाजीमहाराजांच्या कार्याचा आणि या उपक्रमाचा संबंध काय? असा प्रश्न कुणाच्याही मनात येईल. परंतु उपक्रम सुरू करणाऱ्यांची मूलभूत प्रेरणा छ. शिवाजीमहाराजांचे जीवनकार्य ही आहे. छ. शिवाजीमहाराजांनी आपल्या जीवनात तळागळातील माणसाला सुखी करण्यावर भर दिला. प्रथम त्याला मुसलमानी दास्यातून मुक्त केले. दुसरी गोष्ट केली ती, त्याच्यात आत्मविश्वास निर्माण केला. तिसरी गोष्ट केली, ती त्याला सक्षम केले. चौथी गोष्ट केली, ती त्याला धर्माभिमानी आणि जीवनमूल्यांभिमानी बनविले.*

*डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संस्थेच्या कामाची आध्यात्मिक प्रेरणा दत्त संप्रदायाचे स्वामी समर्थ आहेत. त्यांची एक शिष्य परंपरा आहे. आणि या शिष्यपरंपरेने अध्यात्म म्हणजे स्वस्थ बसून ध्यानधारणा करीत राहणे किंवा भजनसंकीर्तन करीत राहणे आणि सद्वर्तनाची प्रवचने देणे एवढेच मानले नाही तर समाजाला दुःखमुक्त केले पाहिजे. समाजाची दुःखं जाणून घेतली पाहिजेत आणि त्यावर उपाययोजना केली पाहिजे. यालाच त्यांनी अध्यात्म जगणं आणि शिवाजी जगणं असं मानलं.*

*डेरवणला मी काय पाहिलं, शिवाजीमहाराजांचा अश्वारूढ पुतळा पाहिला, मावळ्यांची शिल्पे पाहिली, जीवनप्रसंग पाहिले, परंतु यापेक्षादेखील आजच्या काळात छ. शिवाजीमहाराजांना आणि त्यांच्या ध्येयवादाला जगताना पाहिले. हे अद्भुत दर्शन होते. हा सर्व पसारा सांभाळणारे काकामहाराज यांचे पूर्ण नाव अशोक रघुनाथ जोशी असे आहे. ते उच्चविद्याविभूषित (B.E. Civil इंजिनियर) आहेत, पण ते सर्व सोडून गुरुमहाराजांची आज्ञा प्रमाण मानून आपले जीवन त्यांनी श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट या न्यासाला समर्पित केले आहे. माझा मुक्काम सर्व वास्तूमध्ये २६ ते २८ तास असेल. आणि या काळात संस्थेतील जेवढे मान्यवर भेटले, ते सर्व अतिउच्च विद्याविभूषित पण समर्पित आणि सेवाभावी, अतिशय नम्र असे. माझ्यापुढे सर्वांनी नम्र व्हावे असे काही माझे कर्तृत्व नाही, परंतु त्यांची ही विनम्रता या कार्यामागील आध्यात्मिक ऊर्जा आणि छ. शिवाजीमहाराजांची प्रेरणा त्यांच्यापुढे होती. सेवकाने नम्र असावे हे महावाक्य ते जगत होते. वालावलकर मेडिकल कॉलेज आणि त्यासंबंधी आरोग्यसेवा कोकणातील अत्यंत गरीब माणसांसाठी आहे. सहा पदरी हायवेवरून चारचाकी गाडीने जाताना हायवेवरील उत्तम हॉटेलात या दारिद्र्याचे दर्शन होत नाही. शिवजयंतीनिमित्त प्रतिवर्षी अत्यंत गरीब महिलांना साडी वाटप केले जाते. दोनशे महिला आजूबाजूच्या खेड्यातून आल्या होत्या. एका दृष्टिक्षेपामध्ये उन्हाने होरपळलेले, दारिद्र्याने गांजलेले, अकाली वार्धक्याने मलीन झालेले ते सर्व चेहरे छ. शिवरायांचे जीवनकार्य किती अपुरे राहिले आहे याची जाणीव करून देणारे होते. त्यांना बोलावून सन्मानाने साडी देऊन, प्रसाद म्हणून भोजन देऊन मातृशक्तीचा हा सन्मान करणे म्हणजे छ. शिवाजीमहाराज जगणे होय असे मला वाटले. महाराजांनी आपल्या जीवनामध्ये असंख्य मातांना साडीचोळी इनाम देऊन गौरविले आहे, ही परंपरा इथे जिवंत आहे हे जाणवले.*

*आणखी दोन गौरव समारंभही याच सभामंचावरच पाहण्याचे, किंबहुना त्यात सहभागी होण्याचे भाग्य मला लाभले. रुग्णालयाचे*

*कार्य कोकणातील रत्नागिरी, रायगड आणि सिंधुदुर्ग अशा तीनही जिल्ह्यात चालते. या क्षेत्रातील दूरवरच्या गावातील अज्ञ, गरीब आणि गरजू रुग्णांना स्वत:चा वेळ आणि प्रसंगी स्वत:च्या खिशांतील पैसे खर्च करून रुग्णालयात आणून त्यांना उपचार मिळवून देणाऱ्या तीन समाजसेवकांचा रौप्यचषक आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर इयत्ता सातवीची परीक्षा उत्तीर्ण होऊन आठवीत शिक्षण घेणाऱ्या डेरवण परिसरातील १३ मुलींना मनगटी घड्याळे भेट देऊन त्यांच्या जिद्दीचे कौतुक करण्यात आले. या चिमुरड्यांच्या चेहऱ्यावर झळकलेला आनंद खूपच बोलका होता.*

*शेवटी एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख केल्याशिवाय हे कथन पूर्ण होऊ शकणार नाही. येथे जे प्रचंड कार्य गेली पांच दशके सुरू आहे ते श्रीसहजानंदसरस्वती स्वामी महाराज यांचे शिष्य भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर यांनी त्याचा संपूर्ण भार आपल्या खांद्यांवर तोलून धरल्यामुळे साकार होऊ शकले आहे. त्यांच्या पश्चात त्यांचे चिरंजीव श्री. विकासराव वालावलकर आणि त्यांचे कुटुंबीय यांनी हे व्रत पुढे तेवढ्याच समर्थपणे अंगीकारलेले आहे.*

*ते स्थान सोडताना संघात पाठ केलेले गीत मनात घोळत राहिले –*
*‘छत्रपती शिवरायांचा त्रिवार जयजयकार, त्रिवार जयजयकार’*
*धर्माचा अभिमानी राजा । देशाचा संरक्षक राजा । चारित्र्याचा पालक राजा । सदा विजयी होणार ।’*

*शिवरायांचा हा जीवनमंत्र प्रत्यक्ष जगणारे सेवक अनुभवून मी सर्वार्थाने कृतार्थ झालो!*

*(दि. ३० मार्च २०२५च्या साप्ताहिक ‘विवेक’मधून साभार)*



डॉ. श्रीपाद बाणावली यांचे स्वागत



डॉ. आनंद जोशी यांचे स्वागत



डॉ. सुनील नाडकर्णी यांचे स्वागत





# शिवरजनी २०२५ : सूर सूर चैतन्याचा !

## शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला वैद्यकीय विद्यार्थ्यांची श्रीशिवरायांना संगीतिक वंदना




गेल्या वर्षी म्हणजे २०२४ साली SVJCT संस्थेच्या नावीन्याच्या, प्रयोगशीलतेच्या आणि विद्यार्थिकेंद्रित शैक्षणिक धोरणामधून एका अभिनव उपक्रमाची सुरुवात झाली. भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मधील सुप्त संगीतिक गुणांना वाव देणे आणि त्यातून त्यांच्यात परस्परांच्या विषयी आदरभाव, सहयोगभावना या विविध गुणांचा विकास घडवणे अशी अनेक उद्दिष्टे साध्य करण्याच्या हेतूने हा संगीताचा कार्यक्रम प्रेरित झाला. त्याला श्रीकाकामहाराजांचे प्रोत्साहन व आशीर्वाद लाभले आणि ह्या उपक्रमाचे नामकरण 'शिवरजनी' असे करण्यात आले. शिवजयंतीच्या आदल्या दिवशी म्हणजे फाल्गुन कृष्ण द्वितीयेच्या दिवशी अर्थात् तुकाराम बीजेच्या शुभ मुहूर्तावर संध्याकाळी हा कार्यक्रम करण्याचे ठरले. भ. क. ल. ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयातील शरीरक्रियाशास्त्र (Physiology) विभागातील शिक्षक डॉ. अद्वैत गोडसे ह्यांच्याकडे 'शिवरजनी' आयोजनाची सूत्रे सुपुर्द करण्यात आली. तो कार्यक्रम अत्यंत लोकप्रिय तर ठरला, एवढेच नव्हे तर हा कार्यक्रम दरवर्षी शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला करण्यात यावा असे ठरले. त्यातूनच वर्ष २०२५मधील शिवरजनीची बीजे रोवली गेली.

भारतीय संस्कृती व इतिहास, छ. शिवाजीमहाराजांचे प्रेरणादायी आयुष्य आणि महाराष्ट्राच्या संतपरंपरेची शिकवण ह्या साऱ्याचा मिलाफ आजच्या पिढीला आवडतील, रुचतील अशा गाण्यांसोबत करून रंजकता आणि सुसंस्कृतपणा टिकवत २ तासांचा गाण्याचा कार्यक्रम सादर करणे; हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून 'शिवरजनी'ची संरचना करण्यात आली होती.

कार्यक्रमाची सूत्रे अंजली स्वामी (प्रथम वर्ष एमबीबीएस), प्रणव आचार्य (द्वितीय वर्ष एमबीबीएस) आणि ईश्वरी इथापे (प्रथम वर्ष एमबीबीएस) ह्या तिघांनी डॉ. अद्वैत गोडसे ह्यांच्यासोबत सांभाळली. कार्यक्रमाची संहिता लिहिण्यासाठीदेखील ह्या तिघांनी डॉ. अद्वैत ह्यांना मोलाची मदत केली होती. १६ मार्च ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि अभिनव भारत संघटना ह्या दोन्हींचे सहसंस्थापक, गणेश दामोदर तथा बाबाराव सावरकर ह्यांची पुण्यतिथी. श्रीमहाराजांचे श्रद्धेय स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, ह्यांचे ते तेवढेच कर्तृत्ववान ज्येष्ठ बंधू. संतश्रेष्ठ तुकाराममहाराज आणि बाबाराव सावरकर ह्यांना नमन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली ती यमन रागावर आधारित गाण्यांच्या पुष्पगुच्छाने म्हणजे Medley ने. पुढे डॉ. मिहिर बैरट ह्यांच्या 'मोरया मोरया' गाण्यानंतर निर्माण झालेल्या चैतन्यमय वातावरणाला, निखिल तळप ह्या द्वितीय वर्ष एमबीबीएसमधील विद्यार्थ्याने गायलेल्या 'नमो नमो जी शंकरा' गाण्याने अधिक वरच्या पातळीवर नेऊन ठेवले. त्यानंतर बॅचलर ऑफ फिजिओथेरपी (BPTh)मधील अंतिम वर्षांच्या विद्यार्थिनी श्रद्धा जाधव आणि साक्षी खानोलकर ह्या दोघींनी आदि शंकराचार्य विरचित 'गुरुअष्टकम्' आणि संत तुकाराम रचित 'गुरु चरणी ठेविता भाव' हा अभंग सादर केला.

पुढे सोहम् जोगदंड ह्या प्रथम वर्ष एमबीबीएसमधील मुलाने त्याच्या खड्या आवाजात 'शिवबा राजं' गाणे सादर केले

श्रद्धा आणि साक्षी ह्यांनी दासराममहाराजांनी रचलेली छत्रपती शिवाजीमहाराजांची आरती पारंपरिक चालीवर सादर करून 'शिवसमर्थगडा'वर भक्तिमय वातावरण निर्माण केले. ह्या दोन्हीही सादरीकरणात पेटीवर साथीला होती ती सलोनी तांडेल ही प्रथम वर्षं एमबीबीएसमधील गुणी मुलगी. प्रणव वाघचौरे हा तृतीय वर्षा एमबीबीएस मधील विद्यार्थी, ह्याची भारतीय शास्त्रीय संगीतावर विशेष श्रद्धा आहे. त्याने आद्यसंत नामदेव लिखित 'नाम तुझे बरवे गा शंकरा' हा अभंग अत्यंत कसदारपणाने सादर केला. डॉ. मिहिर बैरट, लहानपणी एका प्रसिद्ध वाहिनीवरील Talent hunt स्वरूपाच्या गाण्याच्या स्पर्धेत अगदी अंतिम फेरीपर्यंत पोचून आपली गायकी सिद्ध करणारा कलाकार आता डॉक्टर होऊन अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे म्हणून आता MD Radiologyचे शिक्षण वालावलकर रुग्णालयात घेत आहे. डॉक्टर म्हणून रुग्णांची सेवा, अभ्यास हे सर्व सांभाळून गाण्याचा छंद जोपासत आहे. त्याने 'अवघे गर्जे पंढरपूर' हे गाणे सादर करून श्रोत्यांना भक्तिरसात चिंब भिजवत ठेवले. श्रद्धा जाधव ह्या गोड आणि अत्यंत प्रभावी आवाजाच्या मुलीने 'रखुमाई रखुमाई' हे चित्रपटगीत अत्यंत उत्कृष्टपणे सादर करून कार्यक्रमाची भक्तिरसप्रधानता टिकवून ठेवली. आणि मग पुन्हा सोहम् जोगदंड याने 'हेचि वेळ देवा' हा अत्यंत कठीण चालीतला संत तुकारामांचा अभंग श्रेयस, निखिल आणि प्रणव वाघचौरे ह्यांच्या साथीने असा काही सादर केला की त्याचे गाणे संपल्यावर अक्षरशः श्वास रोखून बसलेल्या श्रोत्यांच्याकडून प्रचंड दाद आली. प्रणव वाघचौरे ह्याने सादर केलेल्या 'वेढा वेढा रे पंढरी' ह्या संत तुकाराममहाराजांच्या अभंगाच्या सादरीकरणादरम्यान प्रणवने सर्व श्रोत्यांनादेखील 'गाते' केले. ह्या अभंगादरम्यान कणाद पाटील (तबला) आणि श्रेयस माने (पखवाज) ह्या दोन्हीही द्वितीय वर्ष एमबीबीएसमधील मुलांच्या वादनाने सर्वांचीच मने जिंकून घेतली. त्यानंतर श्रीसहजानंदसरस्वती स्वामी समर्थ महाराज विरचित 'स्वामी आणि बाबा' हा अभंग साक्षी हिने श्रद्धा, सलोनी, कणाद आणि श्रेयस ह्यांच्या साथीने सादर केला. श्रोत्यांमधील अनेकांना हा अभंग पाठ असल्याने सगळेच जण तिच्यासोबत अभंग गात होते हे विशेष.

तारुण्यसुलभ सात्त्विक शृंगाररसाकडे ही गीतमाला वळल्यावर श्रद्धा जाधवने 'अंखियों के झरोखों से', डॉ. मिहिरने 'कधी तू रिमझिम झरणारी बरसात', श्रध्दा आणि साक्षीचे 'आत्ताच बया का' आणि डॉ. मिहिर व श्रद्धा ह्यांनी मिळून म्हटलेले 'तुमसे मिलके ऐसा लगा तुमसे मिल के' ही गाणी सादर झाली.


कार्यक्रमाचा शेवट आला तसा गाण्यांच्या 'तबियत'मध्ये फरक झाला. जगणे म्हणजे काय ह्या सगळ्यांना सतावणाऱ्या प्रश्नाचे उत्तर देणारे 'किसीकी मुस्कुराहटोंपे हो निसार' है निखिल तळपने सादर केलेलं गाणं असो वा डॉ. मिहिरने सादर केलेलं 'मुसाफिर हूं यारों' हे गाणं आणि त्याच्या जोडीला असलेल्या धीरगंभीर निवेदनाने सर्वांनाच अंतर्मुख केले. आणि शेवटी भारताच्या रक्षणासाठी दिवस-रात्र प्राणपणाने झटणाऱ्या सुरक्षाकर्मींना समर्पण म्हणून गायलेले 'केसरी' हे गीत. हे गीत डॉ. मिहिर, प्रणव, निखिल आणि सोहम् ह्यांनी मिळून सादर केले.

कार्यक्रमाला डॉ. श्रीपाद बाणवली, सौ. मुक्ता वालावलकर, डॉ. नेरूरकर, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. नेताजी पाटील आदी अनेक मान्यवर उपस्थित होते. ह्या सर्वांच्या शुभेच्छा, आशीर्वाद, कौतुकाची थाप पाठीवर घेऊन सर्व गायक व वाद्यवृंद पुढच्या वाटचालीस, परत रुग्णसेवेत आणि अभ्यासाला लागला आहे. श्री सद्गुरुंच्या चरणी ही शब्दसेवा आणि संगीतसेवा समर्पित करून पुढल्या शिवरजनीच्या मनोमन प्रतीक्षेत आहे.



भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण – ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

## सौ. मुक्ता विकास वालावलकर यांचा 'शिवरजनी' कार्यक्रमाविषयी अभिप्राय



प्रति,
भ.क.ल. वालावलकर ग्रामीण
वैद्यकिय महाविद्यालयाच्या
वाद्यवृंदास,

खूपच सुंदर कार्यक्रम तुम्ही सादर केलात. गाण्यांची निवड तर फारच छान आणि मार्मिक. कार्यक्रम वेळेत चालू केलात आणि वेळेत संपवलात. शहरांमधून त्या नियमितपणाचा खूपच उपयोग आणि आदर्श ठेवला जाईल.
प्रत्येकाने वेशभूषा पण उत्तम आणि स्थळानुरूप केली होती. (साडी आणि सलवार-कुर्ता). बसून कार्यक्रम केल्यामुळे अजून शांतता आणि मंद वातावरण निर्मिती झाली होती. निवेदन पण फारच मधुर आणि दुवा साधून चालले होते. शिवरायांचा किल्ला त्यात भर घालत होता. आम्ही सर्वजण अगदी मंत्रमुग्ध होऊन गेलो होतो. असेच खूप यश तुम्हाला वैद्यकिय आणि गायन क्षेत्रात मिळो, अशी मनापासून इच्छा.
सर्वांना खूप शुभेच्छा.

सौ. मुक्ता विकास वालावलकर.
मुंबई.

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवारबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले.Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील – ९९२१२ ५१६९५, उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव – ९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर – ९५८८४ ७९२२०
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035